साहामाही ,, १ ,, ०८
साल अखेरे ७ ,, १०१८
किरकोळ अंकास ................................. ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस..........

Per annum in arrears 7 ,, 1R. 8 as.
Six monthly ........... 3 ,, 8 as
Single copy .............................. 4 as.

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...4a
Repetition per line 8a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXII AKOLA MONDAY 6 FEBRUARY 1888. NO 6

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ६ माहे फब्रुवारी सन १८८८ इ० अंक ६.

## जाहिरात.

टपाल खर्च ०४ आणें

**बनौषधी सार्सा प्रमाणें.**

किंमत एक बाटलीस १॥ रुपया

औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधापासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सार्टिफिकिटें स्थल संकोचास्तव न देतां रोगांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातू, खर, स्त्रियांस धुपणी लागते ती रक्त दूषीत झाल्यापासून हाता पायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग, कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायू, गंडमाळा, भिनस, जळवात, कडकी, अम्ल पित्त, पोटशूळ पोट फुगी, नळ वायू, मस्तक शूळ व मुखरोग, जिभेवरील चट्टे, दातांतुन पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें बरे होतात.

☞ पत्ता–मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा याचे चाळींत डा. धाकजी भानजी सांवत.
Dr. D. B. Sawant.
30-12-1887

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकुर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

आकोले तारीख २९ जानेवारी १८८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

साष्टांग नमस्कार वि वि. पुढील चार ओळीस आपल्या सुंदर अशा 'समाचारांत' जागा द्याल अशी आशा करून आपल्याकडे पाठविल्या आहेत. तर कृपाकरून एवढी मेहेर बानगी कराल नाहींतर कचऱ्याच्या टोपल्याची व ह्या कागदाची भेट कराल म्हणून एवढें जताविले. आपल्याला राग आल्यास क्षमा करा.

गुरु व शिष्य:—

पूर्वींच्या काळा कडे जरा लक्ष दिलें असतां असे कळून येईल कीं माहान् माहान् गुरु व यांचे शिष्य होते, त्यावेळीं गुरुची शिष्यावर पुष्कळ ममता होती व तितकीच शिष्याची ही गुरुचे ठिकाणीं निष्टा असे. सध्याच्या स्थितीकडे लक्ष दिलें असतां पहिल्या व आतांच्या गुरुशिष्यांत महदंतर दिसून येतें. पूर्वींच्या काळीं मोठमोठे राजे आपल्या पुत्रांना धनुर्विद्या वगैरे शिकण्या करितां मोठमोठ्या ऋषी कडे ठेऊन अभ्यास करवीत असत. मोठमोठे राजे, ज्याचे पुत्र जे केवळ यांच्या जिवाच्या पलिकडचे असत; कोणाचाही पुत्र झाला ह्मणून काय झाले तो बहूत करून ज्याचा त्याचा आवडताच असतो, यांत राजाचे पुत्र मग काय विचारावे तें बहूतकरून सर्व प्रजाजनांचे आवडते असावयाचेच. तर, असे आपले केवळ जीवच दुसऱ्याच्या स्वाधीन करीत असत. पण ऋषी वगैरे मंडळीं ही यांना आपल्या पोराप्रमाणेंच वागवीत असत. विद्यामृत पाजून यांनां संतोषित करून आपल्या माता पितरां कडें रवाना करीत असत. फार लांब कशाला, ज्यानें आज ह्या भरत भूमीवर आपला भगवा झेंडा लाविला होता व ज्यानें अनाथ गोब्राह्मणांचा प्रतिपाल करून यांनां यवनांच्या जाभाड्यांतून ओढून काढिले व ज्यांनां केवळ पराधीन होऊन यवनांच्या तोंडाकडे पाहून राहावें लागलें अशा हिंदूनां "स्वतंत्रता" काय चीज आहे ती दाखिवली असे आपले श्रीमंत शिवाजी माहाराज छत्रपती यांनां देखील शिकण्या करितां शहाजी महाराजांनीं दादोजी कोंडदेव ह्यांजकडे ठेविलें होतें व ते त्यावर किती ममता करीत होते हे बहुत करून इतिहासज्ञास माहीत असेलच. परंतु आतांची स्थिती अगदीं उलटच दृष्टीस पडते कारण हल्ली गुरुची शिष्यावर फारच थोडी ममता असते किंबहुना नसतेच असें म्हटलें असतां चालेल. विद्यादान आतां फुकट तर नाहींच परंतु पैसे घेऊनही go out of the room. असें शब्द कानीं पडण्याची पाळी बहुतेक शिष्यांवर आलेली असते. बरें शिष्यांची गुरुवर मर्जी असतेच असे म्हणतां येतनाहीं कारण ती तर काय मुलेंच असतात पण गुरुतर जगाचा अनुभव घेतलेले गृहस्थ असतातनां! मग काय म्हणून यांनीं केवळ अज्ञान (अज्ञान असोत परंतु यांनांतर वाटत असते कीं हीं मुलें अज्ञान आहेत म्हणून) बाळांचा राग मनांत धरून विद्यामृत पाजण्यापासून त्यांना दूर व्हावयास लागावे. पूर्वींप्रमाणेंच काहीं अंशानें सध्यां हायस्कुलातील मुलांची स्थिति आहे असे म्हटलें असतां चालेल कारण त्यांच्या माता पितरांनीं आपाली निजपलिकडची बाळे केवळ विद्या प्राप्त करून घेण्याकरितां आपल्या घराहून वेगळीं करून, ज्यांचा पूर्ण भरवसा व जे केवळ नीतीचे स्थानच व सर्व तऱ्हेनें केवळ त्यांचे वर्तन सुधारक असे जे हायस्कुलांतील शिक्षक ह्यांच्या स्वाधीन करतात. व त्यांना असा पक्का भरंवसा वाटत असतो कीं आमचीं मुलें जरी आह्मापासून दूर झालीं आहेत तरी यांना आपल्यासारख्याच मायाळू अशा गृहस्थाचे स्वाधीन केलें आहे. हर! हर! हा केवळ भ्रम आहे. मुलांच्या आईबापांचें मन जरी पूर्वींच्या लोकांप्रमाणे मायाळू आहे तरी पण सध्यांच्या शिक्षकांची स्थिती कोठे पहिल्या गुरुजी सारखी आहे. घरा 'बाहेर निघून जा' असे कठोर शब्द आईबापांच्या तोंडांतून निघतील काय? परंतु आमचे सध्याचे शिक्षक पहा. ज्यांना पोरांचे आईबाप इतका सन्मान देतात व आपल्या बरोबरचे मानतात ते शिक्षक किती निर्दयी आहेत. तएखादा गुन्हा झाला असल्यास आई बाप मुलाच्या तोंडांतारतील किंवा चार उपदेशाचे शद्ब सांगतील परंतु आमचे सध्याचे शिक्षक मोठ्या उच्च स्वरानें ओरडून ह्मणतात कीं "go out of the class room" अशी अक्षरं तोंडावाटे काढतांना त्यांच्या मनांत असा विचार कधीं येतो काय कीं हीं मुलें येथें कशा करितां आलेलीं आहेत! शिकण्याकरितां किंवा वरील मुक्ताफळे ऐकण्याकरितां! ज्या विद्येकरितां यांनीं आपला गांव सोडला, आपलें घरसोडिलें, आपलें आप्तमित्र सोडले, आपले प्रत्यक्ष आईबाप सोडिले, इतकेंच नव्हे तर आपली शक्तीही क्रमाक्रमानें सोडण्याचा निश्चय केला अशा मुलांना आमच्या सध्यांच्या शिक्षकांनीं त्या विद्येपासून दूर करण्याची इच्छा करावी काय? ते इतकेंच ह्मणतात असें नव्हें तर कधीं कधीं गांवांत एखादा मोठा समारंभ झाला असतां तेथें गुरुंना आपल्या शिष्याची आठवण तरी होते काय? जर यांच्या स्वाधीन लोकानी आपलीं बाळे केलीं आहेत तर त्यांच्या सुख दुःखाविषयीं यांना काळजी घ्यावयास नको काय? पण जर शिक्षकांच्या मनांतून एखादें नाटक करावयाचें असतें तेंव्हा मात्र ता अमकाना फार चांगला, त्या नाचण्याला मी सांगितलें असतां तो माझें खचीत ऐकेल असे शद्ब तोंडावाटे निघूं लागतात. जर त्या मुलांचे प्रत्यक्ष आईबाप येथें असते तर त्यांनीं आपल्या पोरांना सोंगें घेऊन रंगभुमीवर येऊन नाचण्याला परवानगी दिली असती काय? जर नाटके करण्यापासून खरोखर फायदा होत असेल तर त्यांना स्वतांला सोंगें घेऊन नाचण्याला काय हरकत आहे! स्वतांच मशालजी होऊन मशाल धरून उभे रहाण्यास काय ह्मणून लाज वाटावी.

केरळकोकिळ वाचीत असतां ह्या आर्या आढळून आल्या त्या खालीं देतों.

"अरलल अललल गेल पडली ती उग्र ताटका मार्गें॥
आतां रुचे सुभद्रा लागति विद्वान नाटकामार्गें॥
किति थेटरांत गर्दी नठरे लोकांवरी पहा नजर॥
गातां शकुंतलेनें टाळ्याचा काय चालतो गजर॥
ह्याच्या फलश्रुतीच्या विद्यार्थ्यां मानि मातलाकहर॥
वसतां उठतां तोंडीं संगिताचीच मारती लहर॥
कितिपुण्यवान भुकले म्हणाति अहा धन्यधन्य संगीत॥
संकोचन दावाया गुरु शिष्यांनां ही तोड रंगीत॥
शाळेंत नाटकाचा करविति गुरुराजमान्य अभ्यास॥
उत्तम म्हणूं नये का मानवला जो प्रचार सभ्यास॥

---

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांस:—

वि. वि. आपले पत्राचा ता. ३०।१।८८ अंक आज गांवाहून आलों व रात्रींत एका स्नेह्याबरोबर वाचीत असतां पाहिले पानावर एक 'सं' सहीचे पत्र वाचलें तें पाहून मनास बरेंच वाटलें नाहीं. लिहिणारानें बरीच बुद्धी खर्च करून पत्र लिहिलें आहे. परंतु तें अगदीं अपुरें आहे. मग त्याला माहिती मिळाली नाहीं ह्मणा किंवा याची हयगय ह्मणा. असो हा विषय वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होण्यासारखा मोठा महत्वाचा नाहीं. परंतु पहिल्यानें मोठमोठे लोकांनीं सभा वगैरे करून याला चमत्कारीक तऱ्हेचे स्वरूप आणिलें आहे. या अर्थी तो कोणते तरी तऱ्हेनें पुरा जाहलाच पाहिजे मग अस्तीपक्षानें ह्मणा किंवा नास्तीपक्षानें ह्मणा.

रावसाहेब गणपतराव वैद्य यांचे वडील बंधु अण्णा ( यज्ञेश्वर अनंत हे ) त्यांचे ह्मणणे रावसाहेबाचे द्वितीयसंबंधाची जुळवाजुळव करण्यास गेलें हे खास असले तर "परोपदेशे वेळायां सर्वे शिष्टः" ह्या ह्मणी प्रमाणें किंवा बोलणें बोलतां वाटे सोपें करणी करितां टीर कापें या प्रमाणें यांचें जाहलें असे ह्मणण्यास काडीमात्र हरकत नाहीं. कदाचित् अण्णा साहेबांचे मनांत हा प्रसंग आपलेच घरावर येईल असा अदमास पूर्वीं यांचे मनांत आला नसेल.

ज्या वेळेस अकोल्यास श्री गणेशमींदरांतही सभा प्रथम दर्शनी होऊन तुमचे "क्षत्रें"पत्रांत लिहिलेले नियम पास जाहले त्या वेळेस बऱ्याच मंडळींनीं मोठ्या उत्सुकतेनें सह्या दिल्या व त्यांत ह्या अप्रातिम एकमेकावर ममता करणारे द्विबंधुनींही सह्या त्या यादीवर करून दिल्या. असें खात्रीलायक आधारावरून मजला समजलें आहे.

एडिटरराव, इतकेच करून स्वस्थ बसले नाहींत. अणासाहेब त्याठरावाची यादी हातांत घेऊन लोकाना (स्वतःला नव्हे) उपदेश करून सह्या करा यांत देशाचे हीत आहे असें आग्रह पुर्वक सांगत असत. जर त्यांच्या या उद्योगास कोणी अडथळा केलातर ते लोकांच्या हितांत तुम्हो विनाकारण आड येतां असें म्हणून रागावत असत.

"क्षत्रें" पत्रांत लिहिल्याप्रमाणें कादाचित् जर त्यांचे वय ४२ वर्षांचे नसेल अशी एक गजला कल्पना झाली परंतु राव तुम्ही डायरेक्टरांचा आधार देता त्यावरून ते आतां कोणत्याच तऱ्हेनें खोटे म्हणतां येत नाहीं.

मी एका स्नेहाशीं हा विषय बोलत असतां तो म्हणला पत्रीका पाहिल्या वरून त्याचे वय कमी आहे हे जर खरें असल तर मग मात्र दोघे बंधु अकोल्यास जाहलेंले ठरावाचे कचाट्यांतून खास सुटले यांत कांहीं संशय नाहीं, परंतु वरिल कल्पना बरोबर आहे किंवा कसें? मला वाटतें ही ती अगदीं पळापळीची दिसतें. मी त्या बदल विचार करून ठरविले त्यावरून वाटते १८ किंवा २० वर्षांचे वेळेस वय लिहून देताना पत्रीका सापडली नसावी हे म्हणणें जर बरोबर आहे असें म्हटलें तर मग तीच पत्रीका ३६ किंवा ३८ वर्षांनीं निदान वर्ष दोन वर्षे तपास केल्याशिवाय पडे. अथवा वहिनी गत झाल्यापासून एक

आठवड्याचे अंत पत्रिकेचें मानानें वयाची नक्की वर्षें बाहेर कशी पडलीं. बरें जर पूर्वीच सांपडलीं होतीं असें ह्मणावें तर बहुतकरून आफिसांतून डायरेक्टरींताल वय दुरुस्त करण्याकरितां अर्ज केल्याचें ऐकिवांत नाहीं. मग त्यांनीं केला असेल तर कोणजाणें. जर नसेल तर मग गव्हरमेंटचें रिकार्डावर विस्मृति झाली ह्मणण्यापेक्षां पत्रिका विस्मृतीची कां नसावी. मझ्यानें कांहींच ह्मणवत नाहीं परंतु अशीं झालेलीं अनुमानें पुढें टेविलीं आहेत.

रावसाहेबांनीं दाखल झालेलें वयाचें मानानीं आतां लग्न करणें व त्यांस ते देशाचें हित करणारे त्यांचे बंधु ( अण्णा साहेब )यांनीं मदत करणें कोणत्याही तऱ्हेनें निदान आपण जें कृत्य करण्यांत पुढारी होतों त्यास तरी लागून मदत करूं नये. असें त्यांना निक्षून सांगणें आहे व तें त्यांनीं ऐकावें ह्यांत त्यांची प्रतिष्ठा व मोठेपणा आहे. कदाचित् त्यांनां रावसाहेब यांचें दुःख पाहून आपले हात ( उभयतांचे )गतले आहेत ह्याचा विसर पडला असेल. करितां त्यांनीं जागे होऊन स्मरण करावें.

गणपतरावरावसाहेब हे पत्नी वारल्याचें दुःखांत असतील व त्यांचा आपले लोकांतील चालीप्रमाणें दुसरें लग्न करण्याचा बहुतकरून विचार नसावा परंतु ही गोष्ट जबरदस्तीनें त्यांशी लोकांनीं व असांनीं बांधली असावी कारण ते स्वतः विचारी, शिकलेले, शिवाय त्यांची वागणूक पुष्कळ विचाराची आहे हें कोणीही कबूल करील. फक्त रावसाहेबांना ह्या वयांत सर्व गोष्टी अनुकूल आहेत उणे काय ती संतती ह्याशिवाय कांहीं नाहीं. ती पाहिजे असा जर आग्रह असेल तर शास्त्रप्रमाणें विचार करून मार्ग सोधावा.

श्री गणेश मंदिरांत जी सभा जाहली त्याचे पुढारी तुमचे येथील चांगलें वजनदार गृहस्थ आहेत त्यांनीं सभा भरवून रावसाहेबांनां बजावून समजुतीच्या चार गोष्टी सांगाव्यात व त्या बहुतकरून रावसाहेब फुकट जाऊं देणार नाहींत.

रावसाहेबांसही व ह्या मंडळांसही माझी विनंती आहे कीं, हें कार्य ठरलेले नियमाप्रमाणें तडीस जाऊनद्यावें हां विषय वर्तमान पत्रांत ज्या पेक्षां आला त्याअर्थीं आतां तर आह्मी लग्न करणार असा हट्टवादीपणा त्यांनीं करूं नये यादींत सह्या केलेले सर्व लोकांचें खापर यांचे माथीं फुटूं पहात आहे इकडे तरी त्यांनीं लक्ष द्यावें. विस्तार जाहला माफी करावी पुन्हा भेटेन. हें विनंती.

आपला

"रामदास"

---

मु० वाशीम ता० २८।१।८८

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस :---

सा० न० वि० वि० ता० १६।१।८८ इ० रोजीं येथें रा. रा. गुणवंतराव पांडे यांचा अकस्मातमृत्यु झाला. सदरहु इसम सदरहु दिवशीं आठवाजेपर्यंत सकाळीं अगदीं बरोबर असतां एकाएकीं मृत्युनें त्याजवर घाला घातला यामुळें ते राहात होते त्या गल्लींत बरीच लोकांत चळवळ झाली व सर्वांस त्यांचेबद्दल वाईट वाटलें सदरहू इसम फार बाणेदार होते. ह्या गावीं त्यांचे स्नेही ही फार होते. वेळीं अवेळीं आपल्या चालीप्रमाणें ते सर्वांच्या उपयोगीं पडत असत. त्यांच्या अकस्मिक मृत्युची वार्ता ऐकून बहुतेक त्यांचे स्नेही व इतर सांसारिक लोकांचा समुदाय जमला. अकस्मात मृत्युच्या कारणानें पोलीस ही तेथें आले. व चालीप्रमाणें पंचनामा झाला. त्या पंचनाम्यांत पोलीसची शंका दूर होईना सबब येथील सरकारी वैद्यराज मेहरबान सिव्हिल सरजन यांच्याकडे प्रेत तपासणी करितां पोलिसांनीं नेलें. तेथें तपासणीसाठीं जो विधी व्हावयाचा तो चालीप्रमाणें झाला व मेहरबान सिव्हिल सरजन साहेब दयाळू असल्यामुळें फार त्रास न होता लवकर प्रेत दहन करण्यास मोकळीक मिळाली सकाळपासून रात्री आठनऊ वाजेपर्यंत त्यांच्या इष्टमित्रांस व आप्तांस फार त्रास झाला व इतर लोकांनां ही फार वाईट वाटलें. पत्रकर्तेराव मनुष्यदेह किती क्षणभंगुर आहे पहा. एका क्षणांमध्यें बिचाऱ्यास मृत्युनें नेलें. मनुष्याचें जनन झालें व त्याला ह्या मृत्युलोकांतील वारा लागला कीं मग काय विचारतां किती हो त्याच्यामध्यें ताठा व अभिमान उत्पन्न होतो! दुनिया त्याच्या खातरांत नसते. सर्वांस तो तुच्छ मानितो. काय तो मी शाहाणा मी हुशार मी विद्वान असें होतां होतां अकस्मांत जेव्हां यमाजीपंताचे दूत गांठितात तेव्हां मात्र फेंफें होऊन सर्वच जागच्याजागीं राहेत असा हा मृत्युलोकींचा बाजार आहे.

ह्या आठवड्यांत येथें मे. ज्युडिशियल कमिशनर साहेब बाहादूर यांची स्वारी सेशन मुकदम्याकरितां आली आहे. त्यांच्या बरोबर त्यांचे शिरस्तेदार आहेत. सेशन मुकदम्याची मोठी गर्दी होती. एका मुकदम्यांतील पुरुष्यास १० वर्षांची आसामीस ७ वर्षांची शिक्षा झाली. व येथील एका खटल्यांत दोन इसमास देहांत शिक्षा व एका इसमास काळे पाण्याची जन्मपर्यंत अशा शिक्षा झाल्या. आतां सदरहु इसमांनीं गुन्हे केले सबब कायद्याप्रमाणें त्यांस शिक्षा झाल्या त्या योग्य झाल्या व अशा पापी प्राण्यांस अशा प्रकारें होणें ठीकच आहे. परंतु अशा शिक्षा ऐकून अंगावर शाहारे उभे राहतात यांत संशय नाहीं. जर ही शिक्षा अलीशान रेसीडेंट साहेबांनीं मंजूर केली तर हे आज साहा इसम परम दयाळू राणी सरकारच्या पंचवीस कोटी प्रजेतून कमी होणार ना! अडाणी लोकांनो असे गुन्हे करूं नका व अशा भयंकर शिक्षेस पात्र होऊं नका. बा अडाणी लोकांनो तुम्हांस अशा कामांकरितां का मनुष्य देह दिला आहे. जे लोक विद्येपासून पराङ्मुख असतात त्यांत असे प्रकार फार घडतात. विद्वान लोकांत फारच थोडे असे गुन्हे होऊन ते लोक शिक्षेस पात्र होतात. करितां आमच्या दयाळू सरकारच्या राज्यांत अडाणी लोकांनीं जबरदस्तीनें विद्या शिकवून तयार केल्यानें ते वाईट मार्गास अनुसरणार नाहींत व अशाप्रकारें बिचाऱ्यांस शिक्षा भोगावी लागणार नाहीं.

रा. रा. गोविंद गंगाधर दामले हे मेहकराहून मंगरूळपीर येथील आपल्या नुतन तहसिल दरिच्या जागीं जाण्याकरितां येथें आले आहेत. हे पूर्वीं येथें डेपुटी क्लार्क होते. त्यांस तहसिलदारीची जागा मिळाल्यामुळें त्यांचे मित्रमंडळीस फार आनंद झाला आहे. मि. दामले हे पूर्वीं डे० ए० इन्स्पेक्टरचे क्लार्क असत. ते आपल्या हुशारीनें व ईश्वरी कृपेनें ह्या पदास चढले. त्यांस लवकर कायमची तहसिलदारी मिळो असें पुष्कळ लोक इच्छितात. हें काम करण्यांत चांगले असून स्वभावानें उग्र नाहींत हे सात्विक असून कामांत वक्तशीर अशी यांची ख्याती आहे. पुसदचे ही तहसिलदार आपासाहेब हे येथें आले आहेत. मनुष्याला पैसा व हुद्दा मिळणें हे केवळ विद्येवर नाहीं. नशीबावर आहे. खटपट करणें हे मनुष्य मात्राचें काम आहे. त्याजला भरभराटीचा हात देणें हें ईश्वरी सुत्र होय. सदरहु दोघे ही तहसिलदार अलीकडे लोक ज्यांनां विद्वान समजतात ह्मणजे बीए, एम्, ए, कोठें आहेत. परंतु ते आपल्या कामांत हुशार आहेत. त्यांच्यामध्यें माणुसकी आहे. बीए, शिवाय इतर सर्व गुण त्यांच्यामध्यें योग्य असें असल्यामुळें तहशिलदार होण्यास ते योग्य झाले यांत नवल तें काय? नाहींतर एखादा बीए असला व नशीबानें त्याच्या गळ्यांत तहशीलदारीनें माळ घातली व ती त्यांस सावरून धरतां आली नाहीं तर काय त्याची ती बीए करावयाची आहे. मग आमची सातवी आठवी शिकून तहशिलदारी मिळवितात हें बरें कीं नाहीं पत्रकर्ते महाराज.

रा. रा. चिंतामण मोरेश्वर आपटे मंगरूळपीर येथील तहशिलदार रजेवरून नोकरीवर येत नाहींत ते आपल्या पूर्वींच्या जागीं जाणार अशी येथें लोक बातमी बोलतात खरें ईश्वर जाणे. बिचाऱ्यानें आपली सुखाचा दुःखांत पाहिल्यानेंच कां वातली होती अहो इतर खात्यांतील मनुष्यानें ह्या मुलकी खात्यांची हवा मानत कसली? कळावें हे विनंती.

आपला

प्रेमेच्छु

"क्ष"

---

वऱ्हाडसमाचार.

मिती माघ वद्य ९ शके १८०९

---

आमचे मागील अंकांत "क्ष" व या अंकांत "रामदास" या महोनें जीं पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांतील मजकुरांकडे आमचे मित्र रा. रा. गणपतराव वैद्य व त्यांचेबंधू रा. रा. यज्ञेश्वरपंत उर्फ अण्णा मास्तर यांनीं जरूर लक्ष पुरवावें अशी आमची त्यास सविनय सूचना आहे. त्याच प्रमाणें सदरहू विषयांचे संबंधानें मागें भरलेल्या सभेंत ठराव करण्या करितां जमलेल्या धीर व विद्वान गृहस्थांनीं हो याचा विचार करून आपल्या पैकींच एक सभ्य गृहस्थ ठरऊन दिलेल्या रेषेचें उल्लघन करू पाहात आहे तें त्यानें करूनये. अशाबद्दल प्रयत्न करावा. असें जर न होईल तर "पुराणांतील वांगीं पुराणांत" ह्या प्रमाणें होणार आहे. जे गृहस्थ लोकांच्या सह्या घेण्या करितां पुढारी पण घेऊन दारोदार फिरत होते तेच आतां झालेल्या गोष्टी खाकेंत घालून लग्नाची तयारी करण्या करितां पुण्या कडे चालते झाले ही गोष्ट त्यास मोठी लाजिर वाणी आहे. कोणी असें म्हणतील कीं रा. रा. गणपतराव यानां पत्नी वारल्याचें दुःख होत आहे व तितक्यांतच असा मजकुर लिहिण्याचें काय प्रयोजन होतें तर त्यांस आमचें इतकेच सांगणें आहे कीं प्रसंग आल्या शिवाय मनुष्याची परिक्षा होत नाहीं. व नियमांचे बाहेर वागणूक होत आहे असें आम्हांस वाटल्यावरून आमच्या कर्तव्या प्रमाणें आमचें काम सूचना करण्याचें होतें तें आम्हांस करणें भागपडलें "क्ष" नें आपले पत्रांत रा. रा. गणपतरायानीं खरोखर दीघांचा ही पुनर्विवाह होईल असा विवाह करावा अशी एक सूचना केली आहे परंतु आतां तसें ही घडून येण्याचें धोरण दिसत नाहीं कारण एखाद्या रूपवती व तरूण सकेशा विधवा स्त्रीचे मनांत पुनर्विवाह करण्याचेंच जर मनांत आलें तर ती असा, साचें लग्न करन्याची जी वयाची यत्ता ठरविली आहे तीचे बाहेर गेलेला एखादा वयस्क वर कां पत्करील ज्या प्रमाणें तो आपली पत्नीगत झाल्यानंतर दुसऱ्या एका तरूणीच्या मागें लग्ना करितां लागतो तद्वतच ती सकेशाही एखाद्या तरुणाच्या मागें, वयस्क मनुष्याला सोडून, लागल यात संशय नाहीं. असो झालेली चुक थोडक्यांत दुरुस्त होण्या सारखी असल्यास ती सुधारून समाजास एक उदाहरण करून दाखवावें अशी आम्ही रा. रा. वैद्य यास पुन्हा एकवार सूचना करून हा लेख आटपतों.

---

येथें थोडे दिवसापूर्वीं स्टेशनरी वगैरे सामानोंचे एक दुकान कोल्हटकर आणि कंपनी यानांवानें बाजार पेठेंत सुरू झालें आहे प्रारंभ तर भपकेदार आहे परंतु लिहिण्यास वाईट वाटते कीं आमचे एक दोन मित्र त्या दुकानीं कांहीं सामान घेण्या करितां गेले होते त्यांचे सांगण्या वरून असें कळतें कीं तेथें विकणारा कोण, मालाची व त्याच्या किमतीची माहिती कोणास हें कांहीं कळत नाहीं कारण दुकानांत गेलेतर उभे राहण्यास सुद्धा जागा नाहीं कांहीं जिन्नस जर मागितला तर एक म्हणतो तो जिन्नस विकायाचा नाहीं दुसरा म्हणतो याची किंमत १ रुपया तिसरा म्हणतो नाहीं नाहीं त्याची खरी किंमत १। रुपया आहे अखेरीस तोच जिन्नस १२ आण्यास मिळतो या करितां आमची अशी सूचना आहे कीं दुकानचे व्यवस्थापकांनीं अशी बलबल पुरी नहोऊं देण्याकडे व दुकानचे सचोटी कडे ज्यास्त लक्ष पुरवावें.

---

कपडे शिवून वेळेवर मिळत नाहींत अशी जी लोकांची एथें गैरसोय आहे ती दूर व्हावी या उद्देशानें मागें एक "वऱ्हाड सुईंग कंपनी" निघाली होती तिनें थोडकेच दिवसांत राम म्हणून सर्वांना गार करून टाकिलें. आता पुन्हा वरलिहिलेल्या चार खात्यांचे दुकानदारांनींच सुईंग कंपनी ही आपले नावानें काढली आहे. तिचा तरी आतां उत्कर्ष होऊन आमची गैरसोय दूर होवो असें आम्ही इछितो.

---

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 6, 1888

The Government communication to all the local departments on matters pertaining to discipline and moral training in schools will be considered as a

timely one and received favourably by the public. The questions, which are embodied therein, are very important and deserve to be carefully discussed. At a time when the educational system in India is being decried, when it is generally felt that the educational system appears to be brilliant but is not of an eduring character, that it dazzles the eyes but fails to satisfy the needs of people that it turns out shallow and mechanical scholars, who are well versed in theory, but are deficient in practise and worldly wisdom there is no question that proposals like the present ones, which aim at checking the growth of tendencies unfavourable to irreverence in the rising generation, will be most agreeable to persons of the old type. The proposals are in themselves very admirable, but whether there is room for complaints, which it is the desire of the Government to take notice of, is a question. The proposals are put forth for impartial criticism and we wish to express our opinion about them. We are not today in a position to treat all the questions embodied therein, and we shall therefore confine our remarks for the present to three of them.

The proposal of introducing examinations, which the teachers must undergo to qualify themselves for that profession, is very valuable. How many cases can be found in which half educated men, managing to secure the reputation of being successful teachers go about ruining the boys, handed over to their care, mentally, morally and physically. The teaching of these quacks surely affects the general tone of education. The absence of a class of educated and well trained teachers is a great drawback in the present educational system. If the system of compelling teachers to undergo examinations as well as boys, be introduced, it will do incalculable good. We feel that the present system of unlicensed teachers is a most serious evil. We would urge that just as unqualified doctors and unqualified lawyers have become things of the past so should these unlicensed teachers be. It would be a step in the right direction if first of all a strict investigation into the moral characters and qualifications of teachers be made and than certificates be granted to them for teaching in accordance with their capabilities.

Then comes the question of the repression of breaches of discipline in accordance with certain well defined rules. There is very little in our schools and colleges, which requires interferrence of this kind. We know for certain that in every primary and High School rules are laid down for the general discipline of the school and the infringement of them is attended with punishment suitable to the offence. If so, what necessity is there for a proposal of this nature. Are there any cases in which the conduct of our students has been so bad as to bring discredit on themselves and on those connected with them, in which they became so unruly and boisterous as to be checked and kept under control by the aid of the police? We can venture to say that Indian students are naturally and on account of the circumstances they are placed in more docile and innocent than those in England. The very breeding and education they receive at home and abroad in the society is of such a nature that it inculcates principles of passive obedience and contentment with their position whatever it may be. They never even dream of breaking through the discipline of the school. But the case with students in Europe is different. There they are from their birth bread up to independence and freedom of action and naturally they become disgusted with any restraint put upon them, and imitating the example which they see before them daily, strive to shake off their bonds and become unruly. How often have we heard of cases in which students in Europe become unruly and transgress the rules of discipline? Even distinguished men like Cowper, Milton and Clive may be cited as those who in childhood were looked upon as breakers of discipline. Rustication is often heard in London schools, but in India we have only one solitary instance. We may perhaps find an exception or two in some prominent cities but the exception only proves the rule. The students are here by nature very harmless and have always very high reverence for teachers, under whom they receive instruction. The charge of irreverence in our opinion is not well founded and justifiable. Even some Europeans who have spent their lives in the educational department and embraced every opportunity of associating with Indian students, and who therefore deserve to be undoubted authorities on delicate matters like these, totally deny the allegation.

But although there are no feelings of irreverence so far as their teachers are concerned, it must be admitted that there is great scepticism amongst the rising generation regarding the ideas about the Creator of the Universe. But the change is, in our opinion not so much to be deplored, as to be welcomed. The State has always been known to be behind the puplic opinion in religious matters; and perhaps it would not be quite desirable in a stable Government to encourage scepticism by acknowledging it as a welcome sign of the times in State documents. It is no wonder that the old ideas are giving way to new ones and the result is general scepticism. It is so everywhere with the progress of Science and scientific ideas. This is a transition period in India an age of doubt which generally precedes an age of scientific pursuits and discoveries. Looked upon in this light the so called irreverence is rather a thing to be glad of than deplored.

The extension of the boarding system is desirable because of the manifold advantages which a student derives from his association with other students, as also of the intellectual training and mutual interchange of ideas, and discipline. It would be a step in the direction of uniting the heterogenous elements together, of bringing together classes, which otherwise would keep themselves aloof and of getting over prejudices and ill-feelings that are deeply rooted in them, and generally of ameliorating the condition of the society at large. The great obstacle in the way of the extension of the boarding system is that the poor or the middle classes only take advantage of this system, which the rich classes do not. These classes are not in a position to pay the expenses of a decent living and hence the tone of living here is rather low. It is this that has given rise to complaints against this system. The only warning that we wish to give in this case is that the boarding house should not be turned into a prison, as it is now in France, which will be evident from the following question; "My opinion is that when French parents have made up their minds to snud a boy ten years old to lyceum till he is twenty, they have sentenced him to something, very near in severity, to ten year's penal servitude." It is not unlikely that the strictest discipline would lead boys to show a spirit of rebellion.

It is our conviction that the evil of immorality is not so generally common as it is believed, and that there are many public schools which are almost free from it. This is as much as can be reasonably expected, for in any large collection of boys as in men there must be some black sheep. Besides there is another question, to prove which we cannot do better than quote the words of an eminent educationist; "The whole of moral education is a mere form, unless guarranteed by the moral character of him who conducts it. Precept makes a good school master, but example is better. It is the greatest gift we can bestow on others; it is a living lesson, and our minds are more in obedience to example for good or evil than to all the precepts the most eloquent can teach? The moral tone of a school is much less advanced by textbooks than by personal example of the teacher."

As principles of science cannot be firmly impressed on the mind without experiments so moral principles however nicely taught, cannot have a firm hold on minds unless they are backed by personal example. They are forgotten the moment the students leave the school. Here we conclude our remarks today.

---

Under Section 12, Act X of 1882, the Resident is pleased to appoint Mr. G. C. Subrayalu Naidoo, Tahsildar at Morsi in the Amraoti District, to be a Magistrate of the 2nd Class in that District.

---

Captain J. G. Morris, B. S. C., Assistant Commissioner, 2nd Class (Officiating 1st Class), in the Hyderabad Assigned Districts and Judge, Small Cause Court, Khamgao, has been granted privilege leave for two months and eight days with effect from 20th January 1888 or from such subsequent date as he may avail himself of it.

---

Under Section 12, Act X of 1882, the Resident is pleased to appoint Mr. Harbhanjj Rawji, attache in the Basim District, to be a Magistrate of the 2nd Class in that District

---

Under Notification of the Government of India, Foreign Department, No. 156, dated the 30th September 1870, the Resident is pleased to declare that the Court presided over by Mr. Harbhauji Rawji, Attache in the Hyderabad Assigned Districts, shall be of the 4th grade having jurisdiction up to Rs. 1,000.

---

Munshi Ajudhya Pershad, Extra Assistant Commissioner, 3rd Class, in the Hyderabad Assigned Districts, has been granted privilege leave for three months with effect from 1st February 1888, or from such subsequent date as he may avail himself of it.

## वऱ्हाड.

हवामानः— हवा थंड व आकाश स्वच्छ. थंडी बरीच कमी झाली. प्रांतांत हवेचा उपद्रव तुरळक चालूं आहे.

---

मे. कर्नल ग्रांट साहेब दि० क० हे गेल्या आटवड्यांत जळगांवाकडे फिरावयास गेले.

---

येथील सरकारी खजीना मुंबई ब्यांकेकडे देणार अशी मागें बातमी होती. त्या प्रमाणें आतां लवकरच ती व्यवस्था आमलांत येणार असें ह्मणतात.

---

मि. जी. सी. सुबरायलु नायडू तहसिलदार मोरशी यांस सेकंड क्लास माजिस्त्रेट नेमिलें.

---

हैद्राबादचे रेसिदंट.— हल्लींचे रेसिदंट मि. कारडरी हे फेब्रुआरींत राजीनामा देऊन विलागतेस जातील व त्याचे जागीं तेथील फर्स्टअसिस्टंट रेसिडंट मि. फार्बस हे मुख्य रेसिडंट होतील असें ठरलें आहे.

---

मुनशी अयोध्या प्रसाद ए. अ. क. यांस फेब्रुवारीचे १ ले तारखेपासून किंवा ते घेतील त्या तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

---

क्यापटन् जे० जी० मारीस बी. एस्. सी. अ. क. यांस दोन महिने आठ दिवसांची हक्काची रजा २० जानेवारी१८८८पासून किंवा ते घेतील त्या तारखे पासून मिळाली-

---

हरवानजी रावजी अट्याची वाशीम यांस सेकंड क्लास माजिस्त्रेटचे व हजार रुपयेपर्यंत दावे घेण्याचा दिवाणी अधिकार मिळाला.

---

रा० रा० वामन गणेश तहशिदार यांस, दुसरे वर्ग माजिस्त्रेटचा अधिकार मिळाला.

---

मि० विश्वनाथ मुदलीयार आफिसिएटिंग ए० अ० क० यांची यवतमाळ येथें नेमणूक झाली.

---

हैदराबादेहून चांदाकडे जो आगगाडीचा फांटा करण्याचें काम सुरू आहे. त्या संबधानें कांहीं फेरफार करण्याचें घाटत आहे. हैद्राबादेहून चांदास रस्ता न मिळवितां रायपुरास मिळवावा असा विचार चालला आहे-

---

रा. गोपाळ महादेव भिडे क्लार्क आफ कोर्ट बुलढाणें हे रजेवर जाणार असल्याचें कळतें.

---

त्रावण कोरचे महाराज हैदराबादेस येत्या तारीख १५ वीच्या सुमारास येतील, व नंतर तेथून मुंबई कडे जातील असें समजतें.

---

आकोलें बाजार भाव.

हुंडी मुंबईचा दर्शनी ९९।।।-

" १५ दिवस मुदतीची ९९।।-

सुवर्ण........२३ रुपें १०९।-

आळशी खंडीस ८२ उडीद ६२।।

गहूं........काटे ६१। बनसी ६७।।

जवारी नवी.... ५२।। चणे....६२।।

रुई ६८-७१ कापूस ४९....५०

सर्की ७ मीठ ४।। तूप ७।। व तेल १०-

सव्याचे भावः—

जवारी वसंत ४७

गहूं वैशाख शुद्ध १००

## वर्तमानसार.

सिंधप्रांत सरकारानें पंजाब इलाख्याकडें देण्याचा ठराव केला.

बल्गेरियावर स्वारी करावी असा रशिया-च्या सारांचा हेतु आहे.

बगदाद येथें मुसलमान लोकांचें एक कॉलेज स्थापन झालें आहे.

कर्नेल ॲलिझ्यानॉफ अफगानची सरहद्द पहाण्याकरितां गेले आहेत.

रशियाच्या वर्तमानपत्रांत टास्कंद येथील दारूच्या नाहिराती येऊं लागल्या आहेत.

आसाम येथें राजकीय कामाला लागणारा खर्च इलाख्यांतून दिला जावा असें ठरलें आहे.

नेपाळांतील राजकीय व्यवस्थेच्या संबंधानें अझून खास कांहींच समजत नाहीं

इजिप्तचे चालू वर्षाचें बजेट ९४००० पाउंडानें गुदस्तापेक्षां अधिक आहे असें दिसतें.

हंगारी येथें सर्व राष्ट्रें मिळून हत्यारांचा एक मोठा कारखाना काढणार आहेत.

चारजुई येथें रशिअन पायोनिरच्या दोन टोळ्या येऊन दाखल झाल्या आहेत.

मुंबईचे वाडळाचे सपाट्यांत बऱ्याच देशी गाड्या सांपडल्या.

दर वर्षी इंग्लंडला १,६०,००००० पाउंडाचें लोकूट जातें.

काँग्रेसचा खर्च भागविण्याकरितां मद्रासचे लोकांनीं १८००० रुपयांची वर्गणी जमा केली आहे.

प्रेसच्या कायद्यांत सुधारणा करूं नये असें इंडिया कौंसीलचें मत दिसतें.

नलहिस्ट लोकांनीं झारला मारण्या विषयींची केलेली मसलत सेंटपिटर्सबर्ग येथें फुटली मुलतानला देवीची सात सुरू झाली म्हणून देवी काढण्याचें काम ज्यारीनें चालू झालें आहे असें कळतें.

आयरलन्डांतील "कमान्डर ऑफ फोरसीस" ची आज्ञा कमी होणार आहे.

बगदादचे मुसलमान कालेजला निझाम सरकारनें ४००० रुपयांची वर्गणी दिली.

बल्गेरीया या गादी वरून प्रिन्स फरडींनडला काढुन टाकण्याची लौकरच तजवीज होणार आहे.

झारला ठार मारण्याच्या बंडांत असलेले पुष्कळ लष्करी लोक पकडले आहेत.

पंडीत राय शंकर मिस्त्र ना. वे. प्रा. मध्यें स्ट्याटुटरी सिव्हील सरव्हंट नेमले.

ब्रह्मदेश आणि आसाम यामध्यें दळण वळण ठेवण्या करितां चांगले मार्ग शोधून काढले आहेत.

पेशावरच्या आसपास दरोडे मारणारा प्रसिद्ध कमालखान मारला गेला.

लाहोर येथील दिवाण नरेंद्रनाथ एम्. ए. यांचें नांव स्ट्याटुटरी सिव्हील सर्व्हिसमध्यें शेरीक केलें आहे.

नेपाळ येथील राज्य व्यवस्थेचें काम हल्लीं कलकत्याच्या फॉरेन आफिसच्या स्वाधिन केलें आहे.

ब्रह्मदेशांतील लुटारू लोकांस ब्रिटीश सरकारचें सामर्थ्य समजूं लागलें आहे.

ना. वे. प्रा. आणि अयोध्या प्रांतांतील उमेदवार लोकांचे परीक्षेबद्दल फीचें उत्पन्न २,९०,००० रु० झालें.

म्हैसूरचे महाराजानीं आपल्या लष्करी खात्याची व्यवस्था इंडिअन गव्हरमेंटच्या स्वाधीन केली.

निझाम सरकारनीं लंडन येथील जुबिली इन्स्टीटुटला आणखी ९००० रु. दिले.

सर्व शहराला व कँटोन्मेंटला पाण्याचा पुरवठा करण्याबद्दलची अलाहाबाद म्युनिसीपालटीची खटपट फार जारीनें चालू आहे.

सरलेपेल ग्रेफीननें ग्वाल्हेर येथें बोलतांना जी सभ्य भाषा योजली होती त्यावरून व्हाइसराय साहेबानीं दुःख प्रदर्शित केलें आहे असें म्हणतात.

नवीन तऱ्हेची तोफ गोळा सुटल्याबरोबर एकाएकीं गुप्त होऊन दुसरा सोडतांना पुनः एकाएकदम प्रगट होऊन परत गुप्त होणारी तोफ, मेसर्स आर्मस्ट्रांग ह्यानें बनविली आहे हिचें वजन ३० टनांचें आहे. तिचें तोंड १० इंचाचें आहे. ५०० रतलाचा गोळा दर सेकंदांत १८६० फुटीं लांब जातो, इतकी शक्ति ह्या तोफेचे अंगीं आहे. ते० मि०

दोन चाकाची गाडी पायानें हलवून जशी रस्त्यावर चालते तशी पाण्यांत चालण्याची एकानें युक्ति काढली आहे. मनुष्य करील तें होईल.

गुन्हे पकडण्याचे कामीं पोलीस लोक आरोपित व साक्षीदार मारून कुटून तयार करितात व पुष्कळ प्रसंगीं या यमाच्या दुःसह कचाट्यांत गरीब, सात्विक व निरापराधी अशीं मनुष्यें सांपडून प्राणास सुद्धां मुकतात असें मद्रास हायकोर्टाच्या नजरेस आल्यावरून त्यांनीं या बाबदींत फौजदारी कायद्यांत फेरफार करण्याबद्दल सरकारास शिफारस केली आहे. फौजदारासमोरील आरोपीचे जबानीवर आरोपीची सही घेण्यांत येत जाऊं नये व तिचें बिलकूल महत्व मानूं नये तसेंच माजिस्ट्रेटानें आपणासमोर जबानी देण्यापूर्वी आरोपीस, राजखुषीनें सर्व कांहीं सांग वगैरे सूचना देऊनही जबानी आरोपीनें राजखुषीनें दिली आहे अशाबद्दल माजिस्त्रेटानें कारणें लिहिलीं पाहिजेत. मघलें बोट मनगटास लागे इतकें उलटें मोडणें, इंद्रियांस चाप लावणें, झाडाला उलटें टांगून झोके देणें, बुटासुद्धां उरावर पाय देणें मिरच्याची धुरी देणें, कितीएक दिवस उपाशी ठेवणें असे अनेक जुलूम पोलीस लोक आरोपीवर करीत असतात. हें एकदाचें सरकारचे कानांवर गेलें ही चांगली गोष्ट झाली यांत बिलकूल संशय नाहीं.

गोवळकोंडा येथें कांहीं मजुरांकडून खणण्याचें काम चाललें असतां ६० शेर वजनाच्या सोन्याच्या कांबी सांपडल्या आहेत तें सर्व सोनें निझाम सरकारचे खजिन्यांत जाऊन दाखल झालें.

लंडन- ता० २६ जानेवारी--रुपयांची किंमत इंग्लिश सोन्याचे नाण्यानें कमी कमी होत जाऊन हिंदुस्थानांतून विलायतेस जाणारा पैसा सवाईनें जास्त जात आहे. याबद्दल सरकारानें १ रुपया १७ पेन्सांचे किंमतीचा असा ठराव केला आहे व त्याप्रमाणें यापुढें देवघेव होत जाईल.

सोलापूर- गेले गुरुवारी येथील रेल्वे फौजदार यांचें घर फोडून आंतील सर्व चीजवस्त चोरांनीं नेली. विषय किती गेला ते बरोबर कळत नाहीं. पण एकंदरींत फौजदार साहेब सर्वस्वा नागवले असें ह्मणतात. वासुदेव बळवंताला धरण्याच्या कामांत यांना एक चांदीचें पदक मिळालें होतें तें देखील चोरांनीं कातरून नेलें. चोरांचा पत्ता नाहीं. आतां कमाल झाली!!! न्या० सिंधु०

इरावती फ्लाटीला रेलवे कंपनीची सुमारें २५ हजार रुपयांची चोरी झाली.

कपूरथळचे राजे कलकत्याहून निघून पंजाबांत गेले.

या सालीं हिंदुस्थानांतील रुपयाची किंमत विलायतेंत ११ आणे ४ पै झाली आहे.

हिंदुस्थानांत येणाऱ्या राकआईल (घासलेट) वर दरपेटी मागें ८४ जास्त कर वाढणार आहे असें म्हणतात अशा रितीनें तरी या तेलाचा नायनाट होवो म्हणजे बरें होईल.

बंगाल रेल्वेवर अपघात होऊन एक मेला व चार जखमी झाले.

नेपाळचा प्रधान आल्याबरोबर बरेच लोक कलकत्यास आणणार आहेत.

सिंध प्रांत पंजाबाकडे देण्याचा पुन्हा विचार सुरू झाला आहे.

हंगेरीचा प्रधान एमगीझा यास जर्मन बादशाहाकडून ग्रांड क्रास आफ दि आर्डर आफ दिरेड ईगल असा किताब देण्यांत आला.

रशियाची शांतता करण्याची खरीखरी इच्छा आहे असें तिकडून जाऊन आलेले लार्ड रान्डाल्फ चर्चिल सांगतात असलें म्हणतेच बरी.

चांदाकडे रेल्वे न नेतां रायपुराकडे न्यावी अशा अर्थाची एक सूचना निझामापुढें आली

खैबरखिंडींत हल्लीं जे लोक पाहरा करण्या करितां ठेवले आहेत त्यांत आणखी २०० लोकांची भर करण्यांत येणार आहे.

कलकत्यास कांहीं मुलें क्रिकेट (विटीदांडु) खेळत असतां एका मुलांस चेंडूं लागून तो मरण पावला ईकडे क्रिकेट खेळणारांनीं अवश्य लक्ष द्यावें

आजपर्यंत भोपाळसंस्थानाबद्दल जी हकीकत बाहेर आली ती सर्व जुना होती; परंतु आतां असें कळतें कीं भोपाळचे बेगमेचें शत्रु बेगमेस वेडी ठरविण्याचे प्रयत्न करीत आहेत आणि तीस वेडी ठरवून गादीवरून काढावी असा प्रयत्न करीत आहेत आतां ही बेगम खरोखरच वेडी ठरवून डाकटरच्या बुटाखालीं मरते कीं काय याबद्दल आह्मांस मोठी भीती पडली आहे. अझूनपर्यंत या बेगमेस सरकारी रितीनें वेडी ठरविली नसल्यामुळें त्याजबद्दल आजच आह्मी जास्त लिहित नाहीं.

ब्रह्मदेशांत मिठावर जास्त कर बसविल्यामुळें लोक फार नाखुष झाले आहेत.

अतिशय बर्फ पडत असल्यामुळें ग्वालिशियाच्या सरहद्दीवर जागारी फौज जाण्याचें बंद झालें.

या सालीं मिठावरील आठ आणे कर जास्त वाढविल्यामुळें १०५ लक्ष रु० जास्त उत्पन्न होईल. त्याचप्रमाणें ब्रह्मदेशांत मिठावर आजपर्यंत जो ८३ आणे कर होता तो १ रु केल्यामुळें १२ लाख रु० जास्त उत्पन्न होईल.

अफगाणिस्थानांतील खैबरखिंडींतली मालिक (राजे) हे मुंबईस आल्या नंतर कराचीस जातील. नंतर पंजाबांत जातील.

चीनदेशांत मुंबईकडील कापड बरेंच खपूं लागलें आहे. या कापडांत तेलसरपणा जास्त असल्यामुळें लोकांस तें फार आवडतें आणि अशा रितीनें हा व्यापार वाढत चालला तर कांहीं दिवसांनीं मुंबईचा व्यापार बराच वाढेल हें मुंबईचें कापड फ्रेंच इंडोचीनमध्येंही जातें असें ह्मणतात. हांगकांग येथील चिनी व्यापारी टॉंकिन बंदरांत व्यापार सुरू करणार आहेत. आणि मग सहजच मुंबईचा व्यापार वाढूं लागेल. अशा रितीनें हळू हळू चालू असलेल्या या मुंबईच्या व्यापारास म्यांचेस्टर येथील व्यापाऱ्यांनीं अडथळा न आणल्यास हा मुंबईचा व्यापार वाढेल असें आह्मांसही वाटतें टा. अ.


SUCCESS! SUCCESS!! SUCCESS!!!

Competition Challenged! Competition Challenged!!

"Comparison alone is the true test of quality."

A boon to the suffering humanity.

THE ELECTRO GALVANIC RINGS & LOCKETS.



Approved and Recommended by the Modern.

Improved Science of the Day.

TEST, COMPARE AND THEN BUY.

TESTIMONIALS TOO NUMEROUS TO MENTION.

Since the last 12 years we have been manufacturing the Electro Galvanic Rings, and Lockets &c. We can boldly and emphatically assert that our manufactory has already earned a World-wide reputation for genuine production of accomplished workmanship and finest cut. It is needless to mention that the power of electricity has been unanimously pronounced as the most infallible remedial agent in curing the most obstinate and protracted maladies which the human flesh is heir to. It is used next to skin. It acts as a safe guard against the attack of cholera and all sorts of epidemics when used on a healthy and robust constitution. Where doctors and all the existing healing arts have failed to effect any remedy our Electro-Galvanic Rings have been found to effect a miraculous cure. In chronic and painful cases given up by doctors as hopeless it has acted as a charm.

It is a pity that some unlettered folks have been deluding the public with their unusual grandiloquent and trumpeting advertisements by styling themselves as sole manufacturers of Electric Rings &c. whereas they are selling brass stuff in disguise of electricity. We have the assistance and co-operation of some practical scientific men introduced this Electric Galvanic Rings on the recognised basis of modern Science. We can boldly challenge all the existing vendors or manufacturers of the supposed Electro Galvanic Rings and Lockets &c. To prove our assertion and to experiment the genuineness of the existance of electricity in our production, we request ardently every buyer to place the ring on the tongue, when an immediate and unspeakable sensation would be created-should it prove otherwise, we would refund the value. It serves both the purpose of medicine and ornament as medicine it cures all diseases and prolongs the life, as ornament it enhances the affected beauty and adds lustre to the frame. Considering combination of all advantages, we wish no human life should be without it.

Honesty is our Policy-Benevolence is our aims- Dissemminaton of scientific truth is our ends.

Silver Ring Rs.3. Silver Locket Rs.2 Gold Ring Rs.18. Gold Locket Rs. 20.

N. B. Beware of worthless imitation. Seeing our large and increasing sale in the market and mofasil some wicked people have been surreptitiously imitating our articles.

24, Mirzapur Street, Calcutta. — K. C. Dass. & Co. Watch-Makers, Jewellers and Order Suppliers,


हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही .. ८
साल अखेरे ७ १०१८
किरकोळ अंकास ...................०४

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .........

Per annum in arrears 7 .. 1R. 8 as.
Six monthly ........... 3 „ 8 as.
Single copy ........................ 4 as.

Advertisements.
Below 10 lines ...
RPer line over 10...4a.
epetition perline...3a.


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL. XXII AKOLA MONDAY 13 FEBRUARY 1888. NO7

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख १३ माहे फेब्रुवारी सन १८८८ इ० अंक ७



## जाहिरात.

टपाल खर्च ४१ आणे.

### वनौषधी सारसा प्रमाणे.

किंमत एक बाटलीत १॥ रुपया
औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधापासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात. व ह्या संबंधाने झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थल संकोचास्तव न देता रोग्यांचीं नावें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य गरमीचे अनेक प्रकारचे रोग, वातू, खर, त्रिदोष धपणीं लागते तो रक्त दूषीत झाल्यापासून हाता पायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग, कच्चा पारा सेवन केल्याने सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायू, गंडमाळा, पिनस, जळवात, कडकी, आम्लपित्त, पोटशूळ पोटफुगी, नळ वायू, मस्तकशूळ, व मुळरोग, जिभेवरील चट्टे, दातांतुन पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें बरे होतात.

☞—पत्ता मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा यांचे चाळींत
डा. धाकजी भानजी सावत.
Dr. D. B. sawant
30-12-1887


नमुना (नी)

नादारीच्या ठरावाची सावकारास नोटीस देणें तिचा नमुना नादारी मु० नंबर १ १८८८

वि० आत्माराम भिकाजी ए. असिस्टंट कमिशनर साहेब बहादूर कोर्ट जिल्हे बुलढाणें यांचे नादारी कोर्टांत.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यात येते कीं, काळू बल्लद बाळाराम परदेशी कुंभार रहाणार कसबे मलकापूर तालुके मजकूर जिल्हा बुलढाणें हा नादार आहे असा आज तारखेस ठराव झाला आहे आणि तारीख २५ माहे फेब्रुवारी सन १८८८ इ० हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारांनी आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकरिता व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांनी तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनी याबद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल, ते आधार आणि याबद्दल साक्षी समन्स करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें दाखल करावी. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवसापूर्वी तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनी पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड ठेविल्या आहेत.

ज्या नांवावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं ०८ आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

जे सावकार दूरचे रहाणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरा पुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. कळावें तारीख ११-१-८८ ईसवी.

Atmaram Bhikaji
नादारी कोर्टाचे जज्ज

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकर पत्र कर्त्यांच्या मतास मिळून असेल असें समजूं नये.

मुक्काम वाशीम तारीख ४।२।८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

साष्टांग नमस्कार वि० वि० येथील कचेरींत उमेदवार लोकांची गर्दी असते असें दिसते. मुलांनीं कशीबशी येथील विद्यालयाच्या अखेरच्या पायरीपर्यंत अगर मध्येंच म्हणजे सहाव्या इयत्तेचें सर्टिफिकिट मिळालें कीं कृतकृत्य झालों असें समजून लागलींच विद्वान् लोकांच्या मालिकेंत आपली गणना करून मोठमोठ्यांची बरोबरी करूं लागतात. कचेरींत एकाद्याचीं आर्जवें करून तेथें बसण्याची परवानगी मागतात व जे कोणी मोठे असतात त्यांचे येथील मोठे देतील उचलण्याचें कबूल करितात व आपल्या घरचें खाऊन नुसतें कचेरींत बसण्याची परवानगी मिळाली कीं लागलींच त्यांच्यांत इतकी बेपरवाई उत्पन्न होते कीं, फार करून ते कोणास जुमानीत नाहींसे होतात. ही अशी फक्कड मंडळी स्वार होवून निघाली कीं, कचेरींत जाते. नंतर असे पडण्यांत येतें कीं ह्या रिकामटेकड्या मंडळीपासून लोक कामें घेतात. व त्यांस त्याबद्दल कांहीं मिळत नाहीं. घरीं आईबापें समजतात कीं एकदाचा आमचा मुलगा कचेरींत जाऊं लागला तेव्हां आम्ही मोठे नशीबवान. परंतु शेंकडों दिवस अशा प्रकारची उमेदवारी केली तरी यापासून अल्पांश म्हणून कांहीं नाहींच. ही सर्व पोकळ बढाई. कारण सरकारनें नेमलेले उमेदवार निराळे असतात. जो सरकारचे पगारी नेमिलेले उमेदवार निराळे असतां अशा फालतु उमेदवारांस नुसतें बसूं देणें हे तरी बरोबर आहे काय? अशा प्रकारच्या उमेदवारांतून जर कोणी कारकून अगर मोठा गृहस्थ काम घेत असेल तर ते बरोबर आहे असें कोणास वाटेल तर वाटो परंतु मला त्याबद्दल मुळींच बरें दिसत नाहीं सरकारानें नेमिल्याशिवाय उमेदवारी मिळणें कठीण आहे. सरकारची कामें करण्यास निरनिराळ्या दर्जाचे कारकून असतात पूर्वीं उमेदवार लोकांच्या मिळकतीची इयत्ता नसे परंतु आतां तसें नाहीं उमेदवारांत ज्यास्ती उत्पन्न एकाद्या महिन्यास झाले तरी तें आतां सर्व त्याच माहिन्यास उमेदवारांस मिळत नाहीं. त्यांचा कायमच्या कारकुनाप्रमाणें पगार नियमित केलेला असतो. त्याचा पगार वजा जातां बाकी शिल्लक रहाते ती जमा होण्याची चाल आहे. आतां उमेदवार अगर नकलनवीस जे असतात ते केवळ कारकुनाप्रमाणें असतात. आच्यांत व कारकुनांत फरक इतकाच कीं, त्यांची नोकरी पेन्शनास लागू नसते व कारकुनाची असते. हे जे पगारी नकलनवीस असतात ह्याशिवाय इतरांस नुसते बसण्यास परवानगी का मिळते व त्यांच्या हातून कामें का घेतलीं जातात. हीं कामे घेण्याची परवानगी अगदीं मोठ्या जिल्ह्याची पती अंमलदारापासून मिळालेली असेल असें वाटतें नाहीं हे मधल्या मध्येच वशिल्याशिवाने उमेदवार शिरतात. अशी मनाची कल्पना आहे. व हे जर वरिष्ठांच्या परवानगीने कामें करण्यास घेतले जात नसतील तर जे त्यांस घेतात. अगर आपल्यापाशीं नुसतें बसूं देतात ते हें काम कायदेशीरहुकूम करीत असतील असें ह्मणवत नाहीं व जर ते वरिष्टांना कळले तर त्यांच्या ह्या करण्याकडे वरिष्ट कानडोळा करितील असें वाटत नाहीं. ज्या उमेदवारांचें पटात नांव नाहीं व जे अशा प्रकारें कचेरींत येऊन बसतात. त्यांच्या मार्फत कचेरींतील गुह्य गोष्टी बाहेर फुटण्याचा संभव असतो व जर एकादा जबाबदारीचा कागद गफरातफर झाला तर ह्या बद्दलची जबाबदारी कोणावर रहावयाची कोणजाणे. तेव्हां हे जे फालतु उमेदवार कचेरींत येऊन बसतात हें बरोबर आहे किंवा कसें याचा विचार पहाणें ज्याचें काम असेल ते तिकडे लक्ष्य देऊन योग्य वाटल्यास बंदोबस्त होईलच. जो उठला तो उमेदवारी पहातो. यापासून होते काय तर जो उठला तो सरकारी नोकरीवर अवलंबून रहातो. व इतर कांहीं धंदा करण्याचे व स्वतंत्र रीतीनें उपजीविका करण्याचे त्यांच्या मनांत येतच नाहीं. जे पूर्वीं सरकारी नोकरींत लागले आहेत त्यांची सरकारास गरज होती ह्मणून सरकारानें त्यांस नोकरीस ठेविलें तेव्हां त्याची गोष्ट निराळीच आहे आतां नवीन हजारों लोक दिवसानुदिवस तयार होतात. इतक्या लोकांस सरकार नोकरी देण्यास समर्थ नाहीं कारण इतक्या जागा सरकारापाशीं आहेत कोठें! तेव्हां लहान अगर मोठा कोणी असो त्यानें विद्या संपादन केल्यावर त्या विद्येचा केवळ नोकरीच्या कामींच उपयोग करण्याचा विचार मनांत न बाळगितां होतां होईल तो कांहीं तरी स्वतंत्र धंदा करण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति असली पाहिजे. जे थोडी विद्या शिकल्यानें स्वतंत्र धंदे करण्या पुरतें ज्ञान प्राप्त होत नाहीं तेव्हां ते धंदे करावें कसे तर त्यास उत्तर हेंच कीं येथें इच्छा आहे. तेथें कांहींना कांहीं मार्ग सांपडतोच. हल्लीं सरकारी अभिप्राय असा दिसतो कीं स्वतंत्र शिक्षणास चांगलें उत्तेजन द्यावयाचें. तेव्हां निदान फुकटची उमेदवारी पुढील आशेवर बसून करींत रहाण्यापेक्षा गावठी शाळा काढाव्या. जी मंडळी सहावी, सातवी व आठवी इयत्ता शिकून तयार होतात. त्यांनीं चार पांच इयत्तेपर्यंत शाळा काढाव्या. कांहींनीं व्यापार करावा. कांहींनीं शेती करण्याकडे लक्ष द्यावें. अलीकडे शेतीची स्थिती चांगली नाहीं. ती सुधारण्याकडे सरकारचे हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांत कांहीं तरी लक्ष्य लागलें आहे. व कांहीं नवीन तऱ्हेची फळझाडावळ करण्याची खटपट करावी असे अनेक प्रकारचे धंदे करावे, शिकलेले लोकाचे ह्या धंद्याकडे लक्ष्य गेल्यानें ह्याची जितकीं त्वरित अव्यवस्थेवर सुधारणा होईल तितकी दुसऱ्या कोणाच्यानेंही होणार नाहीं. कित्येक बडे बडे साहेब लोक ही आपल्या हातानें हीं कामें कोठें कोठें करितात. ते आपल्या मानमरतब्याकडे लक्ष्य न देताही कामें करितात. मनुष्य शाळेंत शिकला कीं त्यास इतर कामांचा कंटाळा येतो असें का व्हावें शिकलेल्या मनुष्यानें अशिक्षितापेक्षां पाहिजे तें काम करण्यास निरालस्य असलें पाहिजे. कारण शिक्षणाच्या योगानें त्याचें मन पाहिजे ती गोष्ट ग्रहण करण्यासारखें विकास पावलेलें असतें. असें असतां का शिकलेल्या मंडळींच्या मनाचा ओघ भलत्याच दिशेनें वाहूं लागतो. पूर्वींपासून शेती उत्तम असी जगांत ख्याती आहे. परंतु अलीकडे हें खरें सुखाचें तत्व लोक विसरत चालले आहेत. त्यामुळें सुखोत्पत्तीचें साधन जी शेती तिची दुर्दशा होऊन देशाला दारिद्र्यावस्था प्राप्त झाली व ह्या बाबतींत त्वरित सुधारणा शिकलेले लोक मन घालून न करितील तर पुढें परिणाम कठीण. परीक्षा पास होण्यापर्यंत शेती कामाचें विषय असले पाहिजेत. व त्यात नांगर धरून परीक्षांपुढें चालवतां आला पाहिजे नंतर परीक्षा पास होत असें असले म्हणजे शिकलेल्या लोकांना त्या कामाची अनावड थोडी लागेल व तिकडे त्यांचे मन लागून सरकारी नोकरीवर अवलंबून रहाण्यासाठीं उमेदवारींत आपले दिवस फुकट घालविणार नाहींत. पत्रकर्ते महाराज कृपा करून जास्त करून छापावें. हे विनंती

आपला प्रेमळ
"क्ष"

[ मागील अंकावरून पुढें चालू. ]

गुरुशिष्य नाटकापासून फायदे आहेत असें जरी ग्रहीत धरलें तरी तें करणें एकंदरींत चांगलें नाहीं असें कोणीही विचारी मनुष्य क

बूल करील. कोणी कदाचित् असें ह्मणतील कीं एखादे पात्राचा भाग घेऊन रंगभूमीवर येऊन बोलण्यानें सभाधीटपणा येतो व बायकांचें हावभाव कसे करावे हें ही चांगलें समजतें. कल्पना तर फारच चांगली आहे. कारण आपण जन्मापासून पुरुषच आहोत. पहिले पुरुषांचें काम लढाया जिंकण्याचे होते पण आतां आमच्याजवळून शस्त्रें हिरावून घेतल्यामुळें अर्थांत आमच्यांतलें शूरत्व नाहींसें झालें. मनुष्याला काम नसलें ह्मणजे त्याला भलत्या भलत्याच कल्पना सुचतात याच न्यायानें आमच्या सध्यांच्या शिक्षकांच्या डोक्यांत हें वेड शिरलें असेल. परंतु माझ्या मतानें त्यांनां नाटकाशिवाय दुसऱ्या पुष्कळ गोष्टी करण्या सारख्या आहेत. त्यांचीं मनें विद्येनें संस्कृत झालेली आहेत. व त्यांच्यापैकीं पुष्कळांनीं यांत्रिक विद्येचा अभ्यास केला असेल व यंत्रशास्त्राकडें जर त्याची कल्पना धावली तर नाटक करण्यापेक्षां पुष्कळ तऱ्हेनें फायदा होणार नाहीं काय? व बायकांचे हावभाव करण्यापेक्षां हें चांगले कां वाईट? शिष्यांनां जर नाटकांपेक्षां दुसऱ्या एखाद्या मार्गानें सभाधीटपणा येत असला तर त्या मार्गाचा अंगीकार करावा किंवा आपला पहिला मार्गच धरावा? अर्थांत दुसरा एखादा मार्ग असल्यास काय ह्मणून पहिल्या मार्गाचा स्वीकार करावा! आज आपल्या विदर्भ प्रांतांत पंधरावर्षांपासून सतत चालणारी अशी सभा स्थापन झालेली आहे व ईश्वरकृपें करून दरवर्षीं मंडळी येऊन मंडप सुशोभित करीत आहेत. तर त्या सभेपासून आमच्या सध्याच्या विद्यार्थ्यांनां सभाधीटपणा येणार नाहीं काय? नाटक व सभा ह्यांत चांगला मार्ग कोणता असा प्रश्न विचारला असतां कोणी ही समंजस मनुष्य असें सांगेल कीं सभेमध्यें जाऊन बोलणें हें अर्थातच विशेष श्रेयस्कर आहे. एखाद्या ग्रंथकारानें रचलेल्या नाटकांतून एखाद्या कुणब्याचें शब्द पाठकरवून लोकांपुढें तों. हें वेडेंवांकडें करून म्हटलें असतां सभाधीटपणा येतो काय? व ह्या योगानें आमच्या विद्यार्थ्यांचा कांहीं फायदा तरी होतो काय? हर! हर! फायदा होत नाहीं इतकेंच नाहीं परंतु त्यापासून उलटा भलताच वाईट परिणाम मात्र होण्याचा फार संभव आहे. नाटकामध्यें स्त्रीचें सोंग घेऊन "मी नाहीं बाई! मला नाहीं असें आवडायच! इश मेलं. जा मेल असें काय करावं।" इत्यादि शब्द तोंडावाटे काढण्यास ह्या आमच्या विद्यार्थ्यांनां अगदींच लाज वाटूं नये काय? व वरील शब्द उच्चारण्यास व मधून मधून मुरकें मारावयास शिकविणाऱ्या शिक्षकांनीं ही मुलाप्रमाणेंच निलाजरे व्हावें काय? एकंवळ मुलें अज्ञान अशी कल्पना करून पाहिलें परंतु शिक्षक तर अज्ञान नाहींतना ते तर चांगले ज्ञाते असून चारचौघामध्यें शहाणे ह्मणून मोडत असतात मुलांनींच जर आग्रह धरला तर शिक्षकांनीं त्यांचें लक्ष्य तिकडून काढावें तें तर नकारितां उलटें एखादा मुलगा वरील शब्द उच्चारण्यास अगर मुरकें मारण्यास मागें घेऊं लागला तर शिक्षक ह्मणतात कीं "अरे असं काय? ह्या प्रसंगीं असेंच केलें पाहिजे व ते तर तुला केलेंच पाहिजे।। वाः फार चांगली हिताचीच गोष्ट आहे असेंच ह्मटलें पाहिजे.

दुसरें-- मुलांनीं जर बायकांचें सोंग घ्यावें अशीच जर गुरूची उत्कट इच्छा असेल तर आपल्या स्वतःच्या मुलाला लुगडें नेसवून त्याचा नाच व हावभाव ते कां पाहत नाहींत? दुसऱ्याच्या मुलांवर ह्मणून का बरें त्याचा जोरा असावा? नाटक केलें असतां कांहीं फायदा मुलांनां होतो असें जर त्यांचे मत असेल तर एखादें संस्कृत अगर इंग्रजी नाटक कां मुलांकडून ते पाठ करवून घेत नाहींत त्यापासून मुलांची पाठ शक्ती तरी वाढेल. नाटकें करवून त्यांतील हावभाव करून दाखविलेंच पाहिजेत असें कांहीं नाहीं, नुसती पाठ करवून शाळेंत ह्मणवून घेतली ह्मणजे झालें. पांठशाळेंतील विद्यार्थी नाटकांचे प्रयोग करून दाखवितात ह्मणून हायस्कुलांतील अगर दुसऱ्या शाळेंतील विद्यार्थ्यांनीं तसें केले पाहिजे हा न्याय कोठचा? त्यांनीं जर विद्यार्थ्यांनीं अनेक उत्तम उत्तम विषयावर बोलावयास शिकवून त्यांस जर वक्तृत्वोत्तेजक सभेमध्यें बोलावयास पाठविलें तर त्यांचे ते विषय त्यांनां चांगले अवगत होऊन त्यांचें ज्ञान तरी वाढेल. हा फायदा फक्त ज्ञानाच्या संबंधानें झाला. सभेंत जाऊन बोलण्यानें पैशाचा देखील फायदा आहे. कारण जर त्यांचें भाषण सर्वानुमतें पसंत होऊन परीक्षकांनां आवडलें तर ते त्या भाषणकरणारांची पोकळ स्तुती करतील इतकेंच नाहीं तर त्यांनां बक्षिस देखील देतील व तें बक्षिस केवळ निरुपयोगी पुस्तकांचें असतें असें नाहींतर ' रुपये असतात. त्यांच्या योगानें विद्यार्थ्यांनां वाटतील तीं उत्तम उत्तम पुस्तकें विकत घेऊन वाचावयास सोईवार पडतें. नाटकांत स्वतांचा पैसापरीपैसा खर्च होऊन पोकळ शाबासकी मात्र मिळतें; व ती शाबासकी सर्वांकडून नसून केवळ नाटक प्रियजनांकडून असते व ती शाबासकी देतांना त्यांनां लागलेंच असें हा वाटत कीं हीं मुलें त्यांच्या आईबापांनीं नाटक करण्याकरितां येथें ठेवलेला नाहींत तर विद्यामृतसेवन करण्या करितां ठेवलेली आहेत. व हीं नाटकें करण्याकडे त्यांचा पुष्कळ वेळ खर्च होऊन त्यांचें विद्यामृतपान हा अंतरलें असेल. असलीं नाटक करण्यापेक्षां एखादें कसरतीचें जरी नाटक केलें असतें तरी तितका मुलांनां कसरतीचा नाद लागून कसरतीची इर्ष्या मनांत उत्पन्न झाल्यानें त्यांची शक्ती तरी वाढेल व त्यांचीं शरीरें अगदीं कृश नहोतां चांगलीं सुदृढ होतील. परंतु नुस्ते नाटक तेंही संस्कृत किंवा इंग्रजी किंवा कसरत अगर ज्या पासून विद्यार्थ्यांना चांगला फायदा होईल असे नाटक नाहीं तर निव्वळ मराठी. व तें नाटक करण्यांत निदान हायस्कुलांतील विद्यार्थीना कांहींच लाभ नाहीं अशा तऱ्हेचें एक मराठी नाटक करण्याचें येथील शिक्षक मंडळीच्या मनांत येत्या Student's Gathering ( विद्यार्थी समाज ) च्या वेळीं करण्याचें होतें परंतु मला लिहावयास फार आनंद वाटतो तें नाटक करण्याचा त्याचा बेत मोडला.

( पुढें चालूं. )

## वऱ्हाडसमाचार.

मिती फाल्गुन शुद्ध २ शके १८०९

हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी पैकीं कांहींत उत्पन्न बरेंच कमी झालें व खर्च पुष्कळ वाढलेला आहे व तो आणखी कित्येक वर्षे तसाच चालणे अनेक कारणां करिता जरूर आहे म्हणून सरकारानें उत्पन्न वाढविण्या करितां मिठावरील कर वाढविला हा कर लार्डरिपन यांचे कारकिर्दींत सन १८८२ सालांत कमी झाला होता; व तो त्यावेळी कमीं करण्याचा हेतू हिंदुस्थानांतील गरीब गुरीब लोकांवरील कराचा बोजा थोडासा तरी कमी व्हावा हा होता. प्राण्याचे जीवनाला ज्या प्रमाणें पाण्याची अत्यवशकता आहे त्याच प्रमाणें मिठाची अवश्यकता आहे. त्या वांचून कोणाचे ही चालणार नाहीं. गोरगरीबा पासून तो मोठ्या पर्यंत ह्या पदार्थाची सर्वांस अवश्यकता सारखीच. तेव्हां अशा महत्वाच्या व सर्वोपयोगी पदार्थावर सरकार जो कर बसवितें तो तें अप्रत्यक्ष रीतीनें सर्वांवर बसवितें हे अगदीं उघड आहे. आतां मिठावर जितका जास्त कर वाढविला तितका हिंदुस्थानांतील सर्व लोकांवर बसल्या प्रमाणें आहे. आता हा कराचा नवीन बोजा झेपण्याचे लोकांच्या अंगीं समर्थ्य आहे असें म्हणणे सयुक्तिक होणार नाहीं. कारण सन १८८२ साली हिंदुस्थानांतील गरीब लोकांस कराचा बोजा जास्त आहे व तो थोडासा तरी कमी व्हावा असें सरकारांस वाटून त्यांनें हा मिठावरील कर कमी केला होता. त्यास आज सहावर्षें होत आलीं. ह्या सहावर्षांत हिंदुस्थानाचीं स्थिती इतकी सुधारली की त्या देशांतील लोकास पूर्वी पेक्षा बराच जास्त कर देण्याचे सामर्थ्य आलें आहे असें समजून आज हा कर सरकारानें वाढविला आहे कीं काय? अशा समजुतीनें वाढविला असल्यास अशी समजुत सरकारची कशी झाली असेल तें आम्हास समजत नाहीं. गेल्या सहा वर्षांत देशांत ह्मणण्या सारखी व्यापार वृद्धी होउन किंवा कला कौशल्यांत कांहीं सुधारणा होउन किंवा दुसरे कोणत्या ही द्वारें देशाचे हीत होऊन लोकांची विपन्न स्थिती दूर झाली असें म्हणता येत नाहीं. उलट "इइनूटक्स" "उत्पन्ना वरील कर" हा एक कर जास्त बसला. सरकारास योग्य कामा करिता जास्त पैशाची निकड आहे व त्या करितां नवीन कर बसविणे किंवा असलेला कर वाढविणे अगदी जरुरीचें आहेतर कोणता कर बसवावयाचा किंवा वाढवावयाचा याचा पूर्णपणें विचार झाला पाहिजे. ज्या कराचा गरीब लोकास बोजा वाटेल तो कर नेहमी होईल तितका कमी असणे अवश्य आहे. त्यांतून मीठ ह्मणजे त्यांचे खाण्यांतील मुख्य व अतिजरुरीचा पदार्थ त्यावरील कर त्यांस जाणवला पाहिजेच; व तो सरकारानें वाढविला हे फार थोड्या लोकांस पसंत पडेल परदेशातून असा पुष्कळ माल हिंदुस्थानांत येतो कीं त्याचा गरीब लोकांस फार उपयोग नाहीं, व त्यावर जकात बसविली असतां अशी आरडा ओरड होणार नाहीं. सुताचा कपडा व आगपेट्या वगैरे जिन्नस जे उपयोगांत येतात ते शिवायकरून बाकीच्या सर्व मालाव', कांचेचीं भांडी, चिनीचीं भांडीं, यावर वगैरे सारख्या मालावर जकात बसविणे मिठावरील कर वाढविण्यापेक्षां जास्त संयुक्तिक दिसले असतें.

## प्रसिद्ध बापू मेहेंदळे याचा मृत्यू

आह्मांस कळविण्यास अतिशय वाईट वाटतें कीं गेल्याचे मागील आठवड्यांत पुणें येथें वे. शा. रा. रा. नारायणराव त्र्यंबक ऊर्फ बापू मेहेंदळे यांस देवाज्ञा झाली. हे कांहीं दिवस उदराचे व्यथेनें आजारी होते व त्याच आजारानें यांचा अंत झाला. हे महाराष्ट्रांत व आसपासच्या इतर देशांत ऐकून तरी कोणास माहित नाहींत असा एकही मनुष्य सांपडणें कठीण.

हे गृहस्थ चांगले हुशार व विद्वान् असत. व्याकरण, वेदांत, न्यायांचे फार चांगलें अध्ययन करून त्यांत अगदीं निपूण झाले होते. त्यांनीं वैद्यकीचे ज्ञान फार उत्तम संपादन केलें होतें, तें इतकें कीं त्या त्यांच्या वैद्यकीच्या ज्ञानामुळेंच त्यांची सर्वत्र इतकी कीर्ति झाली. त्यास रोगपरीक्षण करण्याची विद्या फार चांगली साधली होती, व ह्या त्यांच्या विद्येची चहूंकडे इतकी प्रसिद्धी झाली होती कीं पुण्यास त्यांचेकडे रोग परिक्षणा करितां फार लांबून लांबून लोक मोठ्या भावानें येत असत. व तो भाव लोकानुभवानें इतका दृढ झाला होता कीं ज्या ज्या लोकांस त्यांची थोडी फार माहिती होती. ते सर्व रोगपरीक्षाच करावे बापू मेहेंदळ्यानींच असें म्हणत असत. नेटिव वैद्यकींतील सद तत्वें चांगलीं आहेत व त्यांचें चांगलें ज्ञान संपादन केलें असतां कसा उपयोग होतो हें बापू मेहेंदळ्यांनीं आपल्या स्वतःच्या परिश्रमानें संपादिलेल्य वैद्यक विद्येच्या कीर्ती वरून सिद्ध करून दाखविलें. त्यांच्या औषधाच्या योजना ही फार चांगल्या असत. जनहितास आड येण्या सारखा त्यांच्या अंगीं दुराग्रहा शिवाय दुसरा कोणता ही दुर्गुण नसे. त्या दुराग्रहामुळें त्यांचे हातून व्हावी तितकी लोकोपयोगी कृत्यें झालीं नाहींत.

मरण समयीं त्यांचें वय ६२ वर्षांचें होतें. त्यास चार मुलें व तीन मुली आहेत; व वृद्ध पत्नी आहे.

बापू मेहेंदळे यांचे मृत्यूनें हिंदुस्थानांतील एक वैद्य रत्न नाहींसें झालें हें पाहून त्यांच्या मृत्युबद्दल सर्वांस फार खेद होत आहे. त्यांचे स्मारक करावें अशी कित्येकांनीं सूचना केली आहे व कित्येक गृहस्थ पांचपांचशे रु. पर्यंत किंवा जरूर लागल्यास त्याहूनही जास्त वर्गणी देण्यास तयार झाले आहेत.

## The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 13, 1888

### SALT DUTY.

The sudden rise in the duty of salt is much to be regreted; the duty was formerly reduced in a prosperous condition of the Indian Finance but since the departure of Lord Ripon the frontier deferences and the Burma war have cost a great deal of money and the present Government is unable to make both ends meet. An increase of income has therefore become inevitable.

There was a way of acquiring income most suitable to the people of India but the interests of Manchester merchants have tied the hands of Lord Dufferin. The times of India justly remarks: "the Indian Government had not independence enough to restore the cotton import duties for the sacrifice of which both political parties at home are equally to blame." Aagain and again the native papers have urged the restoration of the import duties but their suggestions have always been disregarded. It is to be regretted that the political parties in England consider it necessary to make a tool of India for the advancement of their interests. We regard this as a weakness in the system of Government in England. Nobody can deny that the import duties were borne by the natives without any murmur. It would be difficult to make a tax so cheerfully borne. Nor is it objectionable from the point of view of political economy. With all these advantages the duties are not to be reimposed to serve the mercantile interests. Upon this point the agitation of the people of India bear no fruit. No impression is made upon the Government of India. The force of Indian public opinion fails to break through the chains that bind the Government of India. If representative Government had been introduced in India it would have been bound to obey the popular mandate If the question had to be decided by a council the majority of which comes from the natives, we have not the slightest doubt that import duties would not have been withdrawn or if withdrawn they could have been reimposed at any moment. The Government of India goes into the hands of the party which is supreme in England; the result is that this Government has no independent existance. When the party in power in England is defeated the Secretary of State is changed and the new man attempts to ride his own hoblies. We therefore now and then observe a change of policy. The only way that appears to us capable of meeting these difficulties is to carry on the Government under a mixed system, so that public opinion will be able make itself at best partially fail. The people now have out grown the system of Beaurocratic Government. They feel that injustice is done to them. When the unanimous opinion of the multitudes is disregarded.

The Burmah war wos not undertaken for anything connected with the affairs of India. The notices have always regarded the war as unnecessary though the King did not pull on well with the British Government. The punishment meeted out to him is very severe and his condition at the present day is pitiable The expenses of this war should properly have been defrayed by England. But it does come in for even a share of these expenses. In the increase of salt duty Government have been very hard upon the poorest class es of people. Salt duty had already become very difficult for them to obtain and considering its utility in the preservation of health and strength, an argument was afforded to make a reduction in the amount of the salt duty but certainly not an increase. We hope Government is aware that for want of means the labouring *Kulwadies* have to exchange paddy for salt in a quantity which would buy double the salt that is exchanged but the salt is taken from the Sawkar long before rice fields are cultivated and the latter therefore imposes hard terms. We consider the increase of salt duty to be a step in the wrong direction. The Times of India blames Lord Ripon without taking stock of the past. It is not creditable to blame Lord Ripon by necessitating an increase of income in the first place and then complaining that the former reduction was unwise.

---

Preparotions are energetically being made to make the first meeting of the new "Berar High schools Ex-students Gathering" as complete a success as possible. A "mandwa" is being erected in the compound of the Native club house for the lodging of the members of the gathering coming from outside. Dinner parties, speeches on various sub jects, especially social, and means of amusement during idle hours are being arranged for. The gathering is the first of its kind in the province and many are therefore watching the doings of its movers with interest. We hope the efforts of the educated gentlemen striving to make the gathering a useful and important association will attain success.

---

We do not think it unnecessary to give, in short, the history of a case decided by the Presidency Magistrate of Bombay during the last week, I hope the Police and the magistrates of this Province will benefit by it. A Bhatia, by name Mulji Dayal, was passing with some pieces of cloth in his possession A police constable, Bhaoo Jiwaji met him and suspecting him of having stolen those pieces took him, not withstanding his entreaties that he was a gentleman, to the police Station. He was detained there for four hours and then afterwards allowed by a European Chief constable to go. The Bhatia then complained to the Magistrate against the constable. The constable was there upon tried and sentenced to rigorous imprisonment for four months. The Magistrate has recorded in his judgment, that the constable had nothing but a bad intention of dishonouring the Bhatia and that his suspicion was groundless. We hope the Police will, on hearing such instances, cease to abuse their power and to act with any bad motive

---

We are indeed very much surprised and extremely sorry to hear most unfavourable and disgusting accounts about the Maharaja Holkar of Indore. An English paper says about him "His whole time is given to the society of persons of whose character theless said the better,to ears polite. He has quarrell ed with all his relations. He is wholly under the influence of astrologers who keep him in a state of abject superstition. There are not 3 days in a fort night on which he is not afraid to take action for fear of the anger of the stars. Dewan Raghunath Rao is anxious to leave the sinking ship, as are officials of any character." If all that is said by the paper is true we would with due deference only say that the Maharaja Holkar will attend carefully to what the public says about him and his state and remedy the defects pointed out. The Maharaja must know that he has to govern one of the most important principalities in India and to do the difficult work in a way worthy the reputation of his predecessors he must have states manlike men around him to assist with their counsel and that men from the dregs of the people recommended by nothing but slender parts qualified by buffoonery and flattery will, far from being useful, be a most ruinous company to him. Strict attention to the dictates of astrologers and such others as have the aim of impressing minds with abject superstition for their profession is also equally objectionable. Wasting time in the expectation of stars giving auspicious opportunities for doing things is also a pitiable mistake. Domestic quarrels and inattention to the affairs of state have often resulted in a great hardship and even in ruin. The people of India have great hopes in this Prince. He had been to Europe and has seen the countries abroad and has got sufficiently slightened views in political and other matters. We hope that His Highness will do soon all he can to put an end to such a state of things and that we shall ere long hear good accounts about the young prince.

---

## वऱ्हाड.

हवामानः— थंडी अलीकडे जास्त पडूं लागली. आकाश स्वच्छ आहे. हवेचा उपद्रव कोठें कोठें तुरळक आहे.

---

नवीन स्थापन झालेल्या "वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाची" यंदाची सभा येथें येत्या हुताशनीचे सुट्टींत भरणार. समाजाचे मेंबरांची संख्या बरीच झाली आहे व ती आणखी वाढेल असा आजमास आहे. वर्गणी सुमोर २५० रुपये आज पर्यंत जमली आहे. सर्व प्रकारची तयारी फार जारीनें चालू आहे. बाहेरून येणारे मंडळीस उतरण्या करितां छत्राचे आवारांत मांडव देण्याचें काम चाललें आहे. जेवणावळ, भाषणें, व रिकामे वेळीं करमणुकीचें कांहीं तरी साधन, यांच्या तजवीजांत समाजांतील येथील मंडळी अगदीं गढून गेली आहे.

---

प्रोफेसर विष्णु मोरेश्वर छत्रे यांचा सरकसचा खेळ उमरावतीस आला आहे. तो लवकरच येथें येणार असें ह्मणतात.

---

जे मागील वेळीं लोअर व हायर स्टांडर्ड परीक्षेंत एकाच विषयांत नापास झालें त्यांची त्या विषयांत परीक्षा येत्या एप्रिल महिन्यांत होणार असें ह्मणतात.

---

आकोलें बाजार भाव.

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥।– |
| " १५ दिवस मुदतीची | | | ९९॥– |
| सुवर्ण……..२३ | | रुपें | १०९।– |
| आळशी खंडीस ८९ | | उडीद | ६२॥ |
| गहूं……..कांटे ६१। | | बनती | ६७॥ |
| जवारी नवी…. ५२॥ | | चणे | …६२॥ |
| रुई | ६८–७१ | कापूस | ४९ ..५० |
| सर्की ७ मीठ ४॥ तूप ७॥ व तेल ६– | | | |

सध्याचे भावः—

| | | |
|---|---|---|
| जवारी | बसंत | ४७ |
| गहूं बशाख शुद्ध | | १९०३ |

---

## वर्तमानसार.

भू मतिचा खेळ ( निंगपो ) (चीनच्या ) उत्तरेस हायजन ह्मणून एक शहर होतें तें १००० वर्षांपूर्वी समुद्रांत बुडालें होतें तें आतां वर येऊन दिसूं लागलें आहे. संग राजाचे कारकीर्दीतील ताटें आणि दुसरीं भांडीं सांपडलीं आहेत.

— न्यू सौथ वेल्स या देशांत घुशींनीं इतका अनर्थ झाला आहे कीं येथील सरकारानें त्यांच्या नाशाचा उत्तम मार्ग शोधून काढील त्यास अडीच लक्ष रुपये बक्षीस देण्याचा जाहिरनामा छापिला आहे असें समजतें.

— इंदूर येथें ता० २९ जानेवारी रोजीं मोठी सभा भरून न्याशनल सोशिल कानफरन्स आफ इंडिया या संबंधानें एक कमिटी स्थापन झाली. त्याप्रसंगीं हिंदु, मुसलमान, पार्शी, क्रिस्ती, जैन वगैरे लोक जमले होते व महामहोपाध्याय हरिहरशास्त्री हे अध्यक्ष होते. आर्य वैदिक धर्मप्रसारार्थ एक सभा त्या प्रसंगीं स्थापन झाली असें समजतें.

जिलईचे रक्षण पितळेचे उत्तम जिलईचे भांड्यांची झिलई जशीच्या तशी राखण्यास शेल लाख आणि अल्कोहल यांचें वार्निस द्यावें, असा एका शास्त्रज्ञानें शोध काढिला आहे.

"सूचना--रा. रा. भाऊ साहेब नेने यांस असा हुकूम करितो कीं-आमची टोळी दोन हजार लोकांची जमा आहे. तिचें म्हणणें आहे कीं-कोंकणांत उतरावें त्या प्रमाणें तयारी केली आहे. तर पहिल्यानें आपले घरीं येणार आहों. आपण जरूर पांच हजार रुपये तयार करून ठेवावें असा आमचा हुकम आहे रुपये न ठेवाल तर आपल्या भावाची, मुलांची व तुमची एकदम शिर उडवून टाकूं. आपणास नोटिस दिली आहे. आपला पाहरा हुषार ठेवावा. अगाऊ आपणास कळवितों. व तांदूळ, डाळ चांगले: तांदूळ दोन खंडी व डाळ पांचमण असा शिधा पाहिजे—तयारी करून ठेवावीं. नाहीं तर आगलावून देऊन नाकें कापलीं जातील. हुकूम पावतांच आपण तयारी करावी कळावें.
तंट्या भिल व त्याची मंडळी
रहाणार सातपुडा, नेमाड.")

दौंड येथें एक वैरागी भैरोबाच्या देवळांत आसन घालून बसले आहेत ह्यांच्याजवळ निजण्याकरितां एक वीत उंच- तीन हात लांब व एक हात रुंदीची चार पाई आहे. तिच्यावर सुमारें हजार बाराशें एकेक बोटाच्या अंतरानें तीन तीन इंच लांबीचे अनकुचदार दरोबस्त; असे उभे खिळे मारलेले आहेत. त्यावर हे वैरागी बोवा अंगांत कांहींएक वस्त्र न ठेवितां निजत असतात, परंतु बुवांच्या आंगास किंवा पायाच्या तळव्यास ते अणकुचीदार खिळे कांहीं टोंचत नाहींत हीच एक मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. तसेंच यांनजवळ एक बसण्याचा पाट व पायांत घालण्याच्या खडावांची जोडा आहे. ह्या दोहींस ही त्याचप्रमाणें खिळे मारलेले असून वैरागीबुवा पाटावर पाय देऊन बसत असतात व कोठें बाहेर जावयाचें असल्यास पायांत ते खडावा ही घालून जात असतात, परंतु बुवांस कांहीं दुःख होत नाहीं बुवा सर्वदिवस ह्या चार पायावर बसून हातांत जपमाळ घेऊन जप करीत असतात. सर्व गावांतील लोक बुवांस पाहून आश्चर्य करीत आहेत

विजेचा वेग– जेव्हां वीज सुरळीत चालू असेल तेव्हां तिचा वेग दरसेकंडांत २,८८००० मैल असतो, व तिचा प्रकाश दर सेकंदास १,९०,००० मैल जातो, असा शोधकांनीं शोध लाविला आहे.

हल्लींचे निजामाचे प्रधान व निजाम यां-च्यांत बरेपणा नाहीं असें तिकडील पत्रें म्हणतात. ती पत्रें आणखी असें ही म्हणतात कीं, निजाम आणि निजामाचे माजी प्रधान सर सालरजंग यांच्यांत जो तंटा पडला होता तो मिटावण्याकरितां गव्हरनरजनरला कडून विरेसापमाणें नेमलेले प्रायव्हेट सेक्रेटरी कर्नल मार्शल हे तेथील रेसिडेंटाशीं ऐक्यभाव जोडून निजामावर आपला जास्त दाब बसण्याकरितां आणि निजामाच्या प्रधानाचें कांहीं चालून देण्याबद्दल निजामसरकारचें मन वळवीत आहेत. अशा रीतीचें हे कर्नल मार्शलचें वर्तन किती निंदास्पद आहे, आणि निजामाच्या राज्यास व प्रधानाच्या स्वतंत्रतेस किती हानिकारक आहे हें सहज दिसून येईल. माजी प्रधान सर सालरजंग आणि हल्लींचे निजाम यांच्यांत दुर्दैवानें कांहीं लढाईपडल्यामुळें सार्वजनिक कामें सुरळीत चालावीं म्हणून निजामाच्या सांगण्यावरून व्हाईसरायसाहेबांनीं कोणी एक लष्करीकामगार कर्नल मार्शल यास प्रायव्हेट सेक्रेटरी नेमलें. अशा रीतीनें नेमलेल्या प्रायव्हेट सेक्रेटरीस निजामावर आपली पूर्ण दाब ठेवतां येणें, आणि प्रधानाची स्वतंत्रता नष्ट होणें या गोष्टी साध्य होतील असें कोणाच्याही ध्यानींमनीं आलें नव्हते. या कर्नल मार्शलसाहेबाची मुंबईतील दोन्हीही पत्रांनीं फार स्तुति केली होती, परंतु हैद्राबादेतील लोक यांच्या बद्दल नाकें मुरडूं लागली आहेत हैद्राबादसंस्थानांत एक कमिशनरची जागा रिकामी झाल्यामुळें त्या जागेस योग्य अशा कित्येक गृहस्थांची यादी करून ती निजामापुढें ठेवली; परंतु ही जागा या यादींतील कोणत्याही मनुष्यास न मिळतां शेरजउल्हस न नावाच्या मनुष्यास देण्यात आली ही जागा प्रधानाचा विचार न घेतां कर्नल मार्शलानें रेसिडेंटास वळवून रेसिडेंटानें निजामाचें मन वळवून त्या मनुष्यास देण्यांत आली असा लोकांचा समज आहे. कर्नल मार्शलबद्दल वरील जी हकीकत बाहेर आली आहे ती जर खरी असेल तर निजामासारख्या स्वतंत्र राज्यांत कर्नल मार्शलसारखें गोरकाव शिरले तेव्हां आम्ही व दुसऱ्या कित्येक पत्रकारांनीं गोरकावाचा शिरकाव निजामाच्या राज्यांत झाला तेव्हां निजामाच्या राज्यांची धडगत राहावयाची नाहीं व निजाम आणि त्यांचे प्रधान यांच्यांत कधींही ऐक्यभाव राहावयाचा नाहीं असें जें भविष्य केलें होते तें खरें ठरलें. कर्नल मार्शलनें केलेलें कृत्य हें त्याच्या अधिकारांतलें नसून असें करण्यांत त्यानें प्रधानाची किंमत कमी केली असें होतें. अशाच्या प्रकारच्या कामांत हात घालण्याची कर्नल मार्शलस मुळींच जरूर नव्हती. कर्नल मार्शलानें केलेला असला हा प्रकार घाणेरा असून या कृत्यावरून कर्नल मार्शलाचा मूर्खपणा येतो इतकेंच नसून त्यास उपाणी नेमला त्यांच्या पदरींही वेडेपणा येतो.

येत्या उन्हाळ्यांत निजामाचे प्रधान कर्नल मार्शलासह व्हाईसरायाचे भेटीस जाणार आहेत यावेळीं निजामाचे सैन्य आणि रायपुरास नेलेली रेल्वे यांबद्दल वाटाघाट होणार आहे.

रशियाच्या झारास मध्यएशियांतील बादशहा करून त्यास राज्याभिषेक करण्यांत येईल अशी जी मागें गप्प उठली होती आणि ती सरकारी रितीनें खोटी ठरली होती ती आतां खातरीनें खरी होणार आहे असें दिसतें या झारांचा सत्कार करण्याकरितां मर्व येथे एक टोलजंग राजवाडा बांधण्याचें काम सुरू आहे.

ठा० क०

रशियाच्या सैन्याची हालचाल इतक्या नेटानें व त्वरेनें चालली आहे कीं, तिचा परिणाम फारच भयंकर होईल असें दिसते. युरोपांत शांतता राहील, आमची लढाई करण्याची इच्छा नाहीं, वगैरे गोष्टी रशियाच्या झाराकडून व पत्रांकडून सांगण्यांत आल्या त्यावरवर असून आंतून लष्कराच्या तयारीबद्दल हुकूम सुटत आहेत. ओरेनबर्ग, गिझनी नांवगोरड आणि काकेशसप्रांत यांत जें सैन्य आहे तें गाडींत सज्ज राहावें असे हुकूम सुटले आहेत. आस्ट्रियाहंगरीचें जितकें सैन्य आहे त्याच्या दुप्पट रशियाचें आहे. रशिया, आस्ट्रिया व जर्मनसरहद्दीवर उत्तरोत्तर फौज पाठवीत आहे. आस्ट्रिया आणि जर्मनी यांच्या सरहद्दीवर जे रशियाचें सैन्य आहे त्याचा पाडाव आस्ट्रिया व जर्मनीचें सैन्य सहज करूं शकेल असें त्या त्या देशांतील लष्करी कामगारांचें मत आहे; परंतु आणखी सहा महिन्यांनीं रशियाचें सैन्य या सरहद्दीवर इतकें येईल कीं, तें सैन्य आस्ट्रिया व जर्मनीच्या सैन्याचा सहजे पाडाव करूं शकेल. आस्ट्रियाच्या सरहद्दीवर रशियाचें सैन्य उत्तरोत्तर वाढत चाललें असल्यामुळें आमची शांतता ठेवण्याची रशियाची जीं अभिवचनें त्यावर जर्मनी मुळींच विश्वास ठेवूं शकत नाहीं. बेसारेबियांत रशियन फौजेचा एक मोठा भाग लवकरच जाणार आहे असें विश्वासनीय बातमी वरून समजतें. रशियन फौजेची एक टोळी रोमानिया प्रांतावर ठेवावयाची व आस्ट्रियावर ठेवावयाची.

शृंगी मनुष्यें जनावरांप्रमाणें मनुष्याला शिंगें असलेलीं अशीं कांहीं मनुष्यें आफ्रिकेंत आढळतात.

क०

—रा० रा० पी. राजगोपाल चारी, एम ए. बी. एल. यांस मद्रास सिविल सर्विस करितां प्रोबेशनर नेमिले.

— युनैटेडस्टेटस देशांत तीस लक्ष बायका कामधंदे करून पैसे मिळवितात. त्यांजपैकीं शेतीं कामांत सहा लक्ष, कारखान्यांत ६,४०,०००; ९,६०,००० दुकानीं माल विकणाऱ्या, शिक्षक, तारायंत्र खात्यांत वगैरे आहेत. तसेंच २५०० बायका वैद्यकीचा धंदा करतात.

— मिठावर जकात. — हिंदुस्थान सरकारानें ता. १९ जानेवारी रोजीं ब्रह्मदेशांत एक रुपया व हिंदुस्थानांत अडीच रु० प्रमाणें मिठावर जकात चालू आहे.

इटलीच्या फौजेनें आबिसिनियांतील साटी हे ठिकाण आपल्या ताब्यांत घेतलें व त्यांचा विचार पुढें सर करण्याचा दिसतो. सु. प्र.

सरकारी शाई पुष्कळ वेळां फुटते सबब बाजारांतील शाई विकत घेण्यास परवानगी मिळावी म्हणून सरकारा पर्यंत ओरड गेली असतां त्यांनीं लिहिलीं तांबडी शाई येट आफी स्टेट सेक्रेटरीच्या द्वारें विलायतेहून आणवितो व काळी शाई कित्येक मालक्यांतून केमिकल अनालायझरनें पसंत केलेली आहे सबब ती तयार करण्यातच तुम्हांकडून दोष असावेत.

अलाहाबाद ता. ३ — प्रत संस्कार चालू असतां दिल्ली येथील सज्जावरून पडून १६ इसम ठार मेले. व ३० इसम जखमी झाले. ग्या० सिं०

नोटीस.

रा. रा. सदु सुतार राहणार दानापूर तालुके आकोट जिल्हा अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझी व आमची बायको सख्या बहिणी असल्या कारणानें तुमची बायको आजारी होती म्हणून तुम्ही तिला माझे घरीं औषधी वगैरे देण्यास आणून घातली. व औषधी संबंधानें जो खर्च लागेल तो करावा. म्हणून सांगून गेले त्या प्रमाणें आम्ही औषधी करितां शंभर रुपये खर्च केले व पांच सहा महिनें तुमची बायको आमचे येथें आजारी राहून मरण पावली. ती आजारी असतांना तुम्ही दोन तीन वेळा आलें ते वेळेस ही तुम्हांस वर दर्शविलेले खर्चा संबंधीं कळविलें व तुम्ही रुपये मागून देतो असें कबूल केले. व मुद्दामें मनुष्य ही पाठविला होता आज बरोबर रक्कम वेळा ही आले होते परंतु हिंमतराव देशमुख यांतरून कर यांचे सांगण्या वरून तुम्ही रुपये दिले नाहींत करितां तुम्हांस या नोटीसीनें कळविण्यांत येत आहे कीं आपण वर दर्शविलेले देशमुख यांचे सांगण्यावर भरवसा न देतां आठ दिवसांचे आंत रुपये आणून पावती घ्यावी नाहीं येतां तुम्हावर दिवाणीत दावा करून या नोटीसीचे खर्चासुद्धां रक्कम भरून घेतली जाईल तारीख ८ माहे फेब्रुवारी सन १८८८ इ०

(सही)

तुकाराम माननी सुतार

बंदुरे दस्तुर खुद.

नोटीस.

रा. रा. वामन भट बीन जनार्दन भट राहणार शिरखेड तालुके व जिल्हा अकोले यांस नोटीस देणार परशराम वल्लद भवानी पाटील. राहणार शिरखेड नोटिशीनें असें कळावितों कीं, आज अदमासें अडीच वर्षें होत आलीं, मी तुम्हापासून कर्जाऊ रुपये ७५ काढण्याकरितां तुमचे सांगणे प्रमाणें रुपये ०५ चा स्टांपकागद करून दिला व त्यांत तुम्ही मजला तीन वेळां मिळून रुपये ५० पर्यंत आपण कर्जरोखा लिहून दिले. व रोख्यापैकीं ऐन जिनसी रुपये २५ आपल्याकडे आजरावेतों तसेंच आहेत आतां आपल्या रुपयांची फेड आली कापूस एक खंडी किंमत रुपये ३८ व नगद तीन वेळां मिळून रुपये ५८ असें मी एकंदर ९६ रुपये पोंच तुम्हास पावले. आतां या नोटिशीनें असें कळवितों कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आपल्याकडे आलेल्या रुपयांचा व आम्हांस कर्जाऊ दिले रुपये ५० चा सर्व व्याजाचा वगैरे हिशोब करून आम्हांस रुपये पावल्याबद्दल पावती आणि आमचा दस्तऐवज आणून द्यावा. असें न केल्यास रितीप्रमाणें काम चालवून अखेर निकाल होईतोंत या नोटीशीचे खर्चासुद्धां सर्व नुकसान भरून घेतले जाईल. म्हणून दिली नोटीस तारीख ० माहे फेब्रुवारी सन १८८८ इसवी

(सही)

परशराम वल्लद भवानजी पाटील दस्तुर खुद.


SUCCESS! SUCCESS!! SUCCESS!!!

Competition Challenged! Competition Challenged!!

"Comparison alone is the true test of quality."

A boon to the suffering humanity.

THE ELECTRO GALVANIC RINGS & LOCKETS.



Approved and Recommended by the Modern.

Improved Science of the Day.

TEST, COMPARE AND THEN BUY.

TESTIMONIALS TOO NUMEROUS TO MENTION.

Since the last 12 years we have been manufacturing the Electro Galvanic Rings, and Lockets &c. We can boldly and emphatically assert that our manufactory has already earned a World-wide reputation for genuine production of accomplished workmanship and finest cut. It is needless to mention that the power of electricity has been unanimously pronounced as the most infallible remedial agent in curing the most obstinate and protracted maladies which the human flesh is heir to. It is used next to skin. It acts as a safe guard against the attack of cholera and all sorts of epidemics when used on a healthy and robust constitution. Where doctors and all the existing healing arts have failed to effect any remedy-our Electro-Galvanic Rings have been found to effect a miraculous cure. In chronic and painful cases given up by doctors as hopeless it has acted as a charm.

It is a pity that some unlettered folks have been deluding the public with their unusual grandiloquent and trumpeting advertisements by styling themselves as sole manufacturers of Electric Rings &c. whereas they are selling brass stuff in disguise of electricity. We have the assistance and co-operation of some practical scientific men introduced this Electric Galvanic Rings on the recognised basis of modern Science. We can boldly challenge all the existing vendors or manufacturers of the supposed Electro Galvanic Rings and Lockets&c. To prove our assertion and to experiment the igenuineness of the existance of electricity in our production, we request ardently every buyer to place the ring on the tongue, when an immediate and unspeakable sensation would be created-should it prove otherwise, we would refund the value. It serves both the purpose of medicine and ornament as medicine it cures all diseases and prolongs the life, as ornament it enhances the affected beauty and adds lustre to the frame. Considering combination of all advantages, we wish no human life should be without it.

Honesty is our Policy- Benevolence is our aims- Dissemminaton of scientific truth is our ends.

Silver Ring Rs 3. Silver Locket Rs. Gold Ring Rs.18. Gold Locket Rs. 20.

N. B. Beware of worthless imitation. Seeing our large and increasing sale in the market and mofasil some wicked people have been surreptitiously imitating our articles.

24, Mirzapur Street, Calcutta. | K. C. Dass. & Co. Watch-Makers, Jewellers and Order Suppliers.


हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

...माही ... ...
साल ... ७ ॥ १०|१८
अकोळ अंकास ......... ०४

मॅाटिरी.बद्दल.
१० ओळींचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०।०।६
दुसरे खेपेस .........

Per annum in arrears ... ...
Six monthly ........... 3 ... ...
Single copy ............... 6 ...

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10... ...
epetition per line... ...

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOL. XXII AKOLA MONDAY 20 FEBRUARY 1888. NO8

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख २० माहे फेब्रुवारी सन १८८८ इ० अंक ८

SUCCESS! SUCCESS!! SUCCESS!!!

Competition Challenged! Competition Challenged!!

"Comparison alone is the true test of quality."

A boon to the suffering humanity.

THE ELECTRO GALVANIC RINGS & LOCKETS.



Approved and Recommended by the Modern.

Improved Science of the Day.

TEST, COMPARE AND THEN BUY.

TESTIMONIALS TOO NUMEROUS TO MENTION.

Since the last 12 years we have been manufacturing the Electro Galvanic Rings, and Lockets &c. We can boldly and emphatically assert that our manufactory has already earned a World-wide reputation for genuine production of accomplished workmanship and finest cut. It is needless to mention that the power of electricity has been unanimously pronounced as the most infallible remedial agent in curing the most obstinate and protracted maladies which the human flesh is heir to. It is used next to skin. It acts as a safe guard against the attack of cholera and all sorts of epidemics when used on a healthy and robust constitution. Where doctors and all the existing healing arts have failed to effect any remedy-our Electro-Galvanic Rings have been found to effect a miraculous cure. In chronic and painful cases given up by doctors as hopeless it has acted as a charm.

It is a pity that some unlettered folks have been deluding the public with their unusual grandiloquent and trumpeting advertisements by styling themselves as sole manufacturers of Electric Rings &c. whereas they are selling brass stuff in disguise of electricity. We have the assistance and co-operation of some practical scientific men introduced this Electric Galvanic Rings on the recognized basis of modern Science. We can boldly challenge all the existing vendors or manufacturers of the supposed Electro Galvanic Rings and Lockets&c. To prove our assertion and to experiment the igenuineness of the existance of elecricity in our production, we request ardently every buyer to place the ring on the tongue, when an immediate and unspeakable sensation would be created-should it prove otherwise, we would refund the value. It serves both the purpose of medicine and ornament as medicine it cures all diseases and prolongs the life, as ornament it enhances the affected beauty and adds lustre to the frame. Considering combination of all advantages, we wish no human life should be without it.

Honesty is our Policy-Benevolence is our aims- Dissemination of scientific truth is our ends.

Silver Ring Rs.3. Silver Locket Rs. Gold Ring Rs.18. Gold Locket Rs. 20.

N. B. Beware of worthless imitation. Seeing our large and increasing sale in the market and mofasil some wicked people have been surreptitiously imitating our articles.

24, Mirzapur Street, Calcutta. } K. C. Dass. & Co. Watch-Makers, Jewellers and Order Suppliers,

## जाहिरात.

टपाल खर्च ०४ आणे.

## औषधी सार्सा प्रमाणें.

किंमत एक बाटलीस १॥ रुपया
औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधापासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व या संबंधानें आलेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थल संकोचास्तव न देता रोग्यांचीं नांवे मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य गरमीचे अनेक प्रकारचे रोग, दातु, ज्वर, खिवास धुपणीं लागते ती रक्त दुषीत झाल्यापासून हाता पायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग, कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायु, गंडमाळा, विनस, वळवात, कडकी, अम्लपित्त, पोटशूळ पोटफुगी, नळवायु, मस्तकशूळ, व मुखरोग, जिभेवरील चट्टे, दातातून पू येणें, रक्त येणें व तोंडाची रेगुर्डी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें जातात .

—रा. मुंबई फणसवाडीत बाळकृष्ण भिवानी नाखवा यांचे चाळींत
डा. धाकजी मानजी सावत.
Dr. D. B. sawant.
30-12-1887

## विक्रीचीं पुस्तकें

खालीं लिहिलेलीं पुस्तकें अलीबाग येथें "समतदन" छापखान्यांत विक्री करितां तयार आहेत.

अत्युपयोगी ब्रह्मकर्म पुस्तक— ( ऋग्वेदी ) यांत नेहमी लागणारे सैध्यादिक बहुतेक विधान त्रिसुवर्ण वगैरेसह आहेत अक्षर मोठें सुवाच्य किंमत १०१ ट. ख. ०१

हिरण्यकेशीय ब्रह्मकर्म पुस्तक——सुटी पोथी किंमत ०१२ ट. ख. ००६

अरण्यरोदन नाटक——बंगलाचे बावतींत सरकारची, अधिकाऱ्यांची आणि रयतेची स्थिती कशी आहे याचे नाटकरूपानें मौजेचें वर्णन केलें आहे. किंमत ०८ ट. ख. ०१

!!फारच स्वस्त!!

## श्री गु रु च रि त्र

अक्षर सुवाच्य आयंताला रंगाचे टायटल व आरंभी दत्ताचें सुंदर चित्र किंमत १०८ टपाल खर्च वगैरे ०८ जास्त

शुकनीती— ( मुळ संस्कृत ग्रंथ— प्राकृत समश्लोकीसह ) ज्याला आपण व्यवहारज्ञान किंवा पोलीटिकलपणा म्हणतों, त्याचें यांत हुबेहुब चित्र आहे. राजकारणामध्यें व यंत्रालयामध्ये आपले लोक पूर्ण निष्णात होते. असें हा ग्रंथ वाचल्यानें कळून येतें. किंमत १ रुपये ट. ख. ०४

मनोरंजक खोगीर— ( भाग १-२-३ ) प्रत्येकाची किंमत ०१ ट. ख. तिन्ही भाग मिळून ०१

आंग्रे घराण्याचा इतिहास—— किंमत ०८ ट. ख. ०१

श्री एकनाथ चरित्र— यांत एकनाथाच्या अनेक रसाळ कथा आहेत. किं० १ ०८ ट. ख. ०६

ब्रह्मद्वेश— किंमत ०१ ट. ख. १० प्रतिंस ०१

भोपाळची शिकंदर बेगम—ख्रियांना वाचनीय पुस्तक किंमत ०४ ट. ख. ०१

वासुदेव बळवंत फडके यांचें नाटक —— किंमत १ रु० ट० ०२

बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें नाटक—— किंमत १ रु० ट० ०२

शिवाजी महाराजांनीं गोपीनाथ पंडिताशी केलेलें भाषण— किंमत ०१ ट० ख० १० प्रतींस ०१

☞ वरील पुस्तकांपैकीं पाहिजेत तीं पुस्तकें व्हाल्यु पेबलनें मागवावीं. तारीख ११ दिसेंबर १८८७

रावजी हरी आठवले
'समतदन' छापखान्याचे मालक अलीबाग

## नोटीस

रा० रा० मि० कृष्णाजी दिनकर मुक्काम शहर अकोला यास या खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं आपण आपले व आपले घरानजीक चिंचेखालीं असलेली विहिरी नजीकची जागा कीं ज्या जागेतून आम्हा लोकांचे मलकीचे विहिरीचें पाणी आणण्याचा सार्वजनिक मार्ग होता त्यापैकीं आपण कमेटीकडून ६९८ फूट जागा दरसाल ६ आणे भाड्यानें घेऊन ती आवरून भिंत घातली व विहिरीचें पाणी आणण्याचा सार्वजनिक मार्ग बंद केला यामुळें विहिरीचे पाणी आणणें बंद होऊन आणखी ही दुसऱ्या अडचणी आल्या आहेत यासाठीं कळविण्यात येते कीं ज्या प्रमाणें कमेटीचे हुकमापूर्वी सदरील विहिरीचें पाणी आणण्याचा मार्ग होता तो खुला करून ज्या अडचणी आहेत त्या योग्य मुदतींत दूर कराव्यात तसे न होईल तर कमेटीवर व आपल्यावर आम्ही वादी होऊन दिवानी कोर्टांत निवारक न्याय मिळणेस दावा करून त्याबद्दल खर्च आल्यास सोसावा लागेल कळावें तारीख १६ फेब्रुवारी सन १८८८ इसवी.

[ सह्या ]

बनसीलाल फकीरचंद
रामु गुंडासा सोनार
पुंजाजी वल्लद नरसाजी कुनबी
बापु वल्लद किसन सोनार
बाळकृष्ण अनोबा दलाल
मारोती अनोबा दलाल
निंबाजी वल्लद राघोजी तेली
बाळकृष्ण लक्ष्मण पंडीत
नारोबा सोनाजी बुराळे
सदाशिव राजाराम पुराड
बाळकृष्ण रामजी तिमसे
कान्हनु वल्लद नारोबा सुतार
बळीराम सोनाजी रिधोरकर या सर्वांचे तर्फें मुखत्यार बनसीलाल फकीरचंद

## नोटीस

विद्यमान अकोलें शहरचे व्हाईस प्रेसिडेन्ट आणि मुख्य प्रेसिडेंट साहेब यांसीः—

यासाठीं सह्या करणाराकडून कळविण्यांत येतें कीं अकोलें शहरांत बनशीलाल फकीरचंद आणि कृष्णाजी दिनकर यांचे घरानजीक चिंचेखालीं असलेलें विहिरीचें पाणी आणण्या साठीं जो सार्वजनिक जुनाट मार्ग आहे, त्यांकीं कमेटी कडून कृष्णाजी दिनकर यास ६९८ फूट जागा दरसाल दरशेकडा बवरस फुटास १ एक आणा प्रमाणें सहा आणे भाड्यानें तारीख २१ माहे नोवेंबर सन १८८७ इसवीचे हुकूमावरून दिली गेली यामुळें कृष्णाजी दिनकर यानीं सदरहु जागा आवारात भिंतही घातली असें झाल्यानें आम्हा लोकांचे वहिवाटीवर सार्वजनिक रस्त्यानी जाऊन पाणी आणण्याचे बंद झाले व आणखीही अडचणी आम्हास सोसाव्या लागतील या प्रसंगास येऊन ठेपलें आहे. या साठीं या लेखाचे द्वारें अशी विनंती आहे कीं कमेटीनें दिलेलीं हुकूम रद्द करून आमच्या अडचणी होईल तितके लवकर योग्य मुदतींत दुर करण्याविषयीं मेहेरबानीनें तजवीज करावी नाहीं पेक्षां आम्हास वादी होऊन दिवाणी कोर्टांत निवारके न्याय मागण्यास जावें लागेल यासाठीं या विनंतीनें कळविले आहे तरी कोणते मार्गास जावे. याबद्दल उत्तर मिळावें. तसें उत्तर न मिळेल तर आपलेकडून दिवाणी कोर्टांत जाण्याची परवानगी आहे असें समजून वर्तन होईल हे विनंती. तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १८८८ इसवी.

( सह्या )

बनशीलाल फकीरचंद.
रामू गुंडासा सोनार.
पुंजाजी वल्लद नरसाजी कुणबी.
बापु वल्लद किसन सोनार.
बळकृष्ण अनोबा दलाल.
मारोती अनोबा दलाल.
निंबाजी वल्लद राघोजी तेली.
बळकृष्ण लक्ष्मण पंडित.
नारोबा सोनाजी बुराळे.
सदाशिव राजाराम पुराड.
बळकृष्ण रामजी तिमसे.
कान्हनु वल्लद नारोबा सुतार.
बळीराम सोनाजी रिधोरकर.
मुखत्यार बनशीलाल फकीरचंद.

वऱ्हाडसमाचार.

मित्ती फाल्गुन शुद्ध ९ शके १८०९

## वऱ्हाडचा रेव्हेन्यू रिपोर्ट.

सन १८८६–८७

वऱ्हाडांतील रेव्हेन्यु खात्याचा वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून गुदस्त सालीं या खात्याचें काम कसकसें झालें हें कळून येतें आहे. गुदस्त साल वऱ्हाडाला बरेंसें गेलें नाहीं. अलीकडे या प्रांतांत पावसानें बरीच नासाडी मांडली आहे. गुदस्तां जून व जुलै महिन्यांत पाऊस चांगला पडला व त्यावरून यंदा पिकें चांगली येतील अशी शेतकऱ्यांस आशाही उत्पन्न झाली होती परंतु मध्यें आगष्ट महिन्यांत पाऊस मुळींच बंद पडला. तेणें करून खरीपाच्या व विशेषें करून ज्वारीच्या पिकास बराच धक्का पोंचला. पुढें आक्टोबर महिन्यांत एकाएकीं पुष्कळ पाऊस पडला तेणें करून आळशीच्या पिकाची नासाडी होऊन गेली व गव्हालाही धक्का पोंचून कित्येक ठिकाणीं तर त्याचा पेरा पुनः करावा लागला. तथापि गहूं व कपाशी हीं दोन पिकें इतर पिकांपेक्षां बरींच आलीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

वऱ्हाडची शेतकीची जमीन एकंदर [illegible],०२,८१,१६० एकर होती त्यापैकीं फक्त [illegible],९७,९३३ एकर जमीन वहीत करण्याजोगी होती; परंतु लोकांनीं फक्त ७६,४२,८०४ एकर आपल्या ताब्यांत ठेविली. यापैकीं केवळ लागवड केलेली जमीन ६,४४,९२७ एकर होती. लागवडीला इतकी कमी जमीन कां आली याचें उत्तर देण्यास फारसें कुरकुरणें नलगे. दिवसेंदिवस शेतकऱ्यांची स्थिती फार वाईट होत चालली आहे. वऱ्हाडप्रांत उत्तम सुपीक प्रदेशांपैकीं एक ह्मणून गणला जात होता तो पिकां संबंधानें अलीकडे फार गरीब होत चालला आहे. तींच तींच पिकें एकसारखीं निघत चालल्यामुळें व जमिनीला बाहेरून खताचा व्हावा तसा पुरवठा न झाल्यामुळें तिच्या आंगचा कस कमी कमी होऊन ती आतां अगदीं निःसत्व होत चालली आहे. ज्या जमिनींत पूर्वी खंडी खंडीचें पीक येत असें तींत आतां ९।१० मण शिकस्त येते. शिवाय अलीकडे पावसानेंही शेतकऱ्यांवर मोठा कहर मांडला आहे. ज्या वेळेस त्याची गरज आहे त्या वेळीं हे राजश्री स्वस्थ असतात परंतु बरें वाईट पीक निघून तयार झालें व अगदीं हाता तोंडाची गांठ होण्याचा समय आला ह्मणजे यांला फावतें व यांची स्वारी पडूं लागते तेणें करून फार नुकसान होते. जळगांव व अकोट हे दोन तालुके सर्व वऱ्हाडांत पिकां संबंधानें उत्तम ह्मणून गणले जात होते. माजी कमिशनर [illegible]. जोन्स यांनीं तर एकदां आपल्या रिपोर्टांत असें ह्मटलें आहे कीं वऱ्हाडांत पाऊस पडो अगर न पडो जळगांव व अकोट या तालुक्यांचा जो तुकडा आहे तिला नापिकता यावयाचीच नाहीं. यांत दुष्काळ पडावयाचाच नाहीं. हे परंतु उद्गार आतां खरे ठरत चाललें आहेत या तालुक्यांतील वृद्ध गृहस्थांस जाऊन विचारलें असतां त सांगतात कीं अलीकडे जसा पाऊस पडत आहे तसा आह्मी पूर्वी कधींच पाहिला नाहीं.

पाऊस पुष्कळ व अवेळीं पडण्याचें एक मुख्य कारण वऱ्हाडचें जंगल होय. अलीकडे फॉरिस्ट डिपार्टमेंटच्या बंदोबस्तामुळें जंगल बरेच जमले आहे. एखाद्या प्रदेशासभोंवती डोंगर असून त्यांवर दाट झाडी असली ह्मणजे अर्थातच तेथें पुष्कळ पाऊस पडावयाचा. तीच अवस्था आमच्या वऱ्हाडची झालेली आहे सभोंवती सातपुडा व त्यावर जंगल दाट झालेलें मग पावसानें काय करावें असो.

पिकाची व्यवस्था या प्रमाणें असल्या कारणानें शेतकऱ्यांना जमिनी वहीत करण्यास धीर होत नाहीं. कित्येक ठिकाणीं तर सरकारी धारा भरतां भरतां नाकीं जीव येतो. अशी अवस्था झाल्यावर लागवडीची जमीन कमी झाली यांत नवल तें काय? खरीपाची जमीन गुदस्तां पुष्कळ कमी झाली व तिची तूट कदाचित् रब्बीनें भरून येईल असें वाटलें होतें परंतु अकाली पाऊस पडल्यामुळें तसें झालें नाहीं.

पिकांमध्यें शेंकडा १० सावर भाग ज्वारीचे, ३२ कपाशीचे व १४.४ गव्हाचे होते आळशी फारच कमी ह्मणजे फक्त१.९ होती.

जमिनीला इरिगेशन ह्मणजे कालवे नळ वगैरे जे बाहेरून पाणी देण्याचा प्रवात गुदस्त फार कमी झाला. प्रांतांत जे ह्मणून इरिगेशन झालें तें बहुतक बागाईतीला. जिराईतीला नाहींच ह्मटलें तरी चालेल. यांचें कारण असें आहे कीं इकडे तांदूळ जो आणता तो सर्व बाहेरून येतो. दुसऱ्या जिराईत पिकांना बाहेरून पाण्याची गरज लागतच नाहीं. याचें दुसरें कारण जमिनीच्या सुधारणेसाठीं सरकारनें तगाईचा जो कायदा केला आहे त्याचें काम चांगलें झालें नाहीं हें होय. आमच्या कमिशनर साहेबांनीं तर हा कायदा आमच्या प्रांतांत अगदीं निष्फळ होईल, त्यापासून कांहीं फयदा होणार नाहीं असें भविष्य केलें आहे. ते ह्मणतात कीं शेतकरी लोक या कायद्यापासून मुळींच फायदा करून घेत नाहींत. जोंपर्यंत सरकार या पैशावर व्याज घेत आहे तोंपर्यंत सरकाराजवळ पैसा मागण्यास येणार नाहींत कारण त्यांचा असा समज आहे कीं तसें झाल्यावर सरकार व मारवाडी सावकार यांत फरक तो काय? रकम वेळेवर परत करितां आली नाहीं तर सरकारचा तगादा सावकारापेक्षां कडक लागेल व त्याची अंमलबजावणी ही तशीच होईल. साहेब बहादुरांचें ह्मणणें कांहीं अंशीं खरें आहे तथापि त्यावरून त्यांनीं जे भाकीत केलें आहे तें जुनें व अविचाराचें आहे असें ह्मटल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. या संबंधानें रेसिडेंट साहेबांनीं टिका करितांना जें ह्मटलें आहे तें आह्मांस सयुक्तिक दिसतें. जरी फक्त ९,४२५ रुपये या कायद्याप्रमाणें शेतकऱ्यांस दिले आहेत तथापि ही गोष्ट केवळ कायमची झाली आहे. असें म्हणतां येत नाहीं. कांहीं आकस्मिक कारणामुळें असें होण्याचा संभव आहे. नवीनच एखादा कायदा झाला म्हणजे त्याचा उद्देश वगैरे रयतेस समजावून देणें हें सरकारचें काम आहे. दुसरी गोष्ट वर आलेलीच आहे ती ही कीं रयतेला शेताच्या उत्पन्नावर भरंवसा मुळींच राहिला नाहीं त्यामुळें आज सरकारजवळून कर्जाऊ पैसा घेतला पण पुढें कदाचित् पीक फसलें तर कसें होईल ही धास्ती त्यांस आहे. सरकार आपली एक कवडीही फुकट जाऊं देत नाहीं. ही गोष्ट त्यांस धाऱ्याच्या वसुलावरून माहीत झालेलीच आहे तेव्हां या कारणामुळें सरकाराजवळ पैसे मागण्यास त्यास धीर होत नाहीं. तथापि कमिशनर साहेबांनीं आपल्या जिल्हा व तालुका कामगारांकडून या कायद्याचें खरें तत्व व त्यापासून होणारे फायदे रयतेच्या मनावर चांगले ठसवून देण्याचा प्रयत्न करावा अशी मे. रेसिडेंट साहेबांप्रमाणें आमची मे. कमिशनर साहेबांस सूचना आहे असें केलें असतां हा कायदा आणखी जारीनें अमलांत येण्याचा व त्यापासून शेतकींचा फायदा होण्याचा संभव आहे.

( पुढें चालूं. )

एतद्देशीय लोक आम्हांस हुशार, विद्वान व राज्यकारभारांचे गोष्टींत चतुर व चांगले माहितगार असे लोक बरेच आहेत. व दिवसानुदिवस त्यांची संख्या जास्त होण्याची आशा आहे तेव्हां कौन्सिलांत आमचे लोक जास्त असावेत अशी सरकारचे कानीकपाळीं रात्रंदिवस आरडाओरड करीत आहेत. वर्तमानपत्रांतून, मोठमोठ्या सभांच्या मानपत्रांतून नेहमीं सरकारास हो विनंती असतेच. तीस सरकार जरी द्यावी तशी जागा देत नाहीं तरा तिजकडे त्यानें आजपर्यंत अगदीं दुर्लक्ष ही केलें नाहीं. आनरेबल मंडलिक, दादाभाई नवरोजी, राजा प्यारी मोहन मुकरजा, सरदिनशामाणिकजी पेटिट इत्यादि लोकांच्या आजपर्यंत कौन्सिलदाराच्या जागीं नेमणुका झाल्या व पुढें ही सरकार आणखी जास्त लोकांच्या नेमणुका करील. आमच्यातील लोकाची एवढ्या मोठ्या महत्वाच्या जागीं नेमणूक व्हावी ह्मणून जें आमचे लोक नेहमीं ह्मणत असतात त्याचा हेतू एवढाच कीं ज्या आमच्या लोकांची या जागीं नेमणूक होत जाईल त्या सर्वांनीं आपल्या देशाच्या कल्याणाकरतां सरकारचें हितास अन्यायानें आड येण्याचा प्रयत्न न करितां आपल्या विद्वत्त्वा व प्राप्त झालेल्या अधिकाराचा सदुपयोग करावा. परम दयाळू इंग्रज सरकारचे अमलांत सर्व गोष्टींत प्रत्येकास मत स्वातंत्र्य आहे, प्रत्येक महत्वाच्या गोष्टीचे संबंधानें लोकमत्त काय आहे हे समजण्यास वर्तमान पत्रें, व कित्येक ठिकाणीं स्थापन झालेल्या मोठमोठ्या सभा, ही उत्तम साधनें आहेत. या सर्व साधनांचा उपयोग करून देश सेवा या लोकांकडून चांगली घडावी अशी सर्व एतद्देशीय लोकांची आशा असते. पण अलिकडे गव्हरनर जनरल यांचे कौन्सिलांत चाललेला प्रकार ऐकून ह्या आशेचा खरोखर भंग होईल असें वाटूं लागलें आहे. परवां नुकताच मिठावरील कर वाढवावा व केरोसिन तलावर कर बसवावा ह्मणूच कायदे मंजूर झाले त्या वेळीं ते कायदे योग्य आहेत ह्मणून आमच्या नेटिव कौन्सिलदारांचीं अनुकूल मतें पडलीं. हें ऐकून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं? लोक स्थितीचा कळकळीनें चांगला विचार करून तिजविषयीं आपलें खरें मत सरकारास निःपक्षपातानें कोणाचे ही गोडगोड शद्बास भुलून आपलें जबाबदारीचें कर्तव्य कर्मास न विसरतां, कळविणारे लोकांची कौन्सिलांत खरोखर उणिव आहे असें यावरून दिसतें; व तीं असण्याचें कारण सरकारानें कान्सिलदाराच्या नेमणुका सर्वस्वी आपल्या हातांत ठेविल्या आहेत. या शिवाय दुसरे नसावें. वास्तविक लोक मतानें कौन्सिदाराच्या नेमणुका होऊन लोक नियुक्त कौन्सिलारांच्या हातून राज्य कारभारांतील पुष्कळ कामें चालणें हल्लींचें राज्य स्थितीस व देश स्थितीस योग्य आहे.

इतर प्रांतांतील दिवाणी कोर्टांप्रमाणें या प्रांतांतील दिवाणी कोर्टांसही उष्ण काळाची सुटी मिळत असते. मुंबई इलाख्यांतही सुटी दीड महिना, १ मे ते १५ जून पर्यंत असते. व इकडे ती फक्त एकच महिना, १५ मे ते १५ जून पर्यंत, असते. असें कां? हा प्रश्न सहज उत्पन्न होतो. ही सुटी देण्याचा चहूंकडे हेतु सारखाच. असें असून इकडे ती सुटी अशी थोडी व अवेळीं स्थानिक सरकारनें कां ठेविली आहे हें समजत नाहीं. वास्तविक, ही सुटी इकडे योग्य वेळीं व पुरेशी असणें जास्त अवश्य आहे, कारण ह्या प्रांतांत उन्हाळा इतर प्रांतांपेक्षां जास्त कडक असतो हें सर्वत्र ठाऊक आहे. ह्या अगदीं उघड गोष्टीचे संबंधानें आतां तरी सरकारनें विचार करावा. इतर प्रांतांसारखी इकडेही निदान दीड महिना तरी सुटी देणें अगदीं जरुरीचें आहे.

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 20, 1888

## MORAL EDUCATION

(from our issue of 23- 1- 88.)

In these columns we discussed at length three of the most important suggestions embodied in the Government resolution on moral discipline in schools and colleges and tried to give some practical solution of the problems which is vitally important in the interests of education in this country. Today we wish to touch the remaining points. The question of punishment is very nicely and justly dealt with. According to the principles of justice the offender alone should be liable to punishment and not his parents or guardians. The imposition of a fine for breach of discipline or insolence does not in the least affect a student but his parents. So this kind of taxing them is not justifiable at all in any case. Now and then there may arise some occasions on which there would be no other remedy but this for reclaiming the insolent and disobedient student but even in this extreme case such punishment should be avoided as far as possible. The punishments suggested in the Resolution—imposition of tasks, deprivation of privileges, a judicious use of the rod in the case of young pupils, and finally expulsion in the case of persistent and aggravated misconduct appear to us the only great ones; which should be availed of for punishing breaches of discipline.

The scheme of keeping a conduct register will not be altogether favourably

looked on by parents. As long as the reports about the general conduct of students based upon the entries in the conduct register are sent periodically to the parents they will not take any objection to the scheme. On the contrary they will feel themselves greatly indebted to the masters for giving them information from time to time about the moral character, behaviour and progress of their sons. But when they see that these conduct registers have a bearing upon the prospects of their sons, when they are launched in the sea of life, and are likely to affect their interests, they are likely to take objection to the scheme. It is generally found that in eight out of ten cases, boys who are most mischievous and boisterous in their younger days, turn out to be most quiet and exemplary in their mature age. History as well as daily experience supplies overwhelming proof in support of this statement. This being the case it cannot be considered advisable that in filling appointment special regard should be paid to the entries in the conduct register. The ruin of all future prospects for a trifling offence committed in an immature and inexperienced age is a punishment out of all proportion to the offence. Hence it would be better if some modifications be introduced in this case.

## THE COMING SUMMER VACATION.

For the last two or three years nothing has been done by the Local Government in the matter of extending the May Vacation beyond the usual peirod of one month viz 15th May to 15th June. There is every reason for extending the Vacation to six weeks at the least so as to bring it on a par with that allowed in the Bombay Presidency. By the beginning of April, here in Berar the heat is enormous, and by the middle of that month it becomes almost unendurable. The Vacation if at all it is meant to meet some useful end must commence from the middle of April; the day on which it may end being 5th June at the soonest. Berar is admittedly very hot during summer and as there is no pachydermatous character claimed for the children of the soil, the Vacation should be made to cover, so far as possible, the unendurable portion of the season. A longer Vacation than now is necessary as well in the interests of parties and pleaders concerned with suits, as of the Judges of the Court.

The Sarvajanik Sabha should certainly make a representation this year in the matter. Applications for the extension of the period during the past years have been very late and probably the Local Government could not get the necessary sanction in time. The Sabha has we learn in contemplation, an application of the kind and there is no doubt it can make out a very good case for the much needed extension. The Vacation as it now is, is very oddly timed; and the Sabha can at any rate ask that the Vacation might commence from 1st May if not from 15th April. We earnestly wish that the Sabha makes some immediate move in the matter.

We have occasionally expressed our approbation of the excellent administration of the Local Municipality and have always given credit for it to all the municipal members and the Vice President especially. But of late we hear on all sides poor men bitterly and piteously complaining against the Municipalty. The complaints are almost all of one nature and it is this that the Municipality allowed the men complaining to first build their houses on certain sites and then afterwards when they had started the work and finished the construction of walls and or had nearly completed their houses ordered them to vacate the sites by dismantling the work done and offered other sites and thus put them to losses too heavy to be borne by them. The piece of land near the town-wall given some time ago to Mr. Panalker for gardening purposes is, the gentleman says, taken back from him forcibly. The complaints of the the first nature do not apparently seem to be groundless. If the people had commenced to build their houses on sites allowed to them for the purpose it was certainly not fair on the part of the municipal Commissioners to issue another order and put them to heavy losses. We do not know anything about Mr. Panalker's complaint. But the fact that the man is kept in ignorance of the grounds under which the land is taken back from him throws suspicion on the conduct of the Municipality in his case. When the Municipality does any thing it is the duty of the body to explain to persons concerned the circumstances or the rule sunder which it does it. We hope, if the complaints are real, the higher authoritie will look into them.

The monitorial system, if not carried to its farthest extremity is beneficial to the interests of the boys and the school, and is found to work with remarkable success in many schools. The advantages of this system are two-fold. One is that the influence of the superintendent who is one among two hundred, and whose position is thus very delicate and precarious, is widely diffused over all boarders, who cannot be kept under control easily. The other is that it secures the ultimate and chief end of the school and college training, and prepares them for the battle of life, where responsibilities are very great and the struggle for distinction is keen. Besides it instils into them indirectly a knowledge of the principles of self-government, which is generally found to be defective among us. It teaches them how they should be submissive to the superior authority, how they should combine to do credit to themselves as well as to the institution with which they are connected; how personal interests should be merged in the general interests of the community and generally how they should exert to advance the prosperity of their country, which must look to them for the advancement of its national position. And now we will conclude with one word about professors. We regret to say that the relations existing at present between the professors and students are not as one would wish them to be. The work now done by professors is merely of a mercenary character. Affection which ought to attach the hearts of students to their professors is generally found to be wanting. Indifference and want of sympathy are the general defects imputed to them. They do not make themselves at home among students. Hence familiarity, interchange of thoughts, discussions on general and social topics between professors and students are not often heard of in colleges. The defect is one that could easily be remedied. The types to be followed more or less in this respect being the professors of missionary Colleges at Bombay.

The announcement of the resignation of the Viceroy at the end of the fourth year of his term has unexpectedly come upon and surprised us. Rumour was afloat that the Viceroy was complled to resign for differences of opinion between himself and the secretary of state. But it is contradicted by the Viceroy himself who in his speech in the legislative council has declared that private and domestic considerations alone have compelled him to resign, and that his relations with the India office have been most cordial. He has shown great zeal and vigilance for the welfare of the natives of this country, and was ready to lend his ear to the grievances expressed through the medium of the press. He is a sympathiser of the natives of this country and has gained popularity. Though he cannot come up to Lord Ripon, still he meant to do much for this country. He desired to introduce reforms into the legislative council, but he has been little able to fulfil his promise, as external circumstances called away his attention and left him no leisure. The imposition of the obnoxious salt tax and the annexation of Burma have in part tended to diminish his popularity.

Simultaneously with this announcement has come the news of the appointment of Lord Lansdown, the governor of Canada, as the successor of the present Viceroy. He is the representative of a high family and is known to be a distinguished scholar. He is very highly spoken of by the Viceroy himself, who soys 'If the choice were laid on me he is the very person whom I could have suggested possessing as he does every quality to recommend him to the confidence of the crown and the nation. He is the grandson of our most venerable statesman and was initiated from his earliest youth in the conduct of serious political affairs." He has gained popularity in Canada and so may he do here.

## SUMMARY OF NEWS.

The Gaekwar of Baroda returns to India immediately.

A scheme is submitted to supply Bangalore with water.

The demarcation of the Afghan Boundary is finished.

Theft of Government arms at Rawalpindi still continues.

The unfortunate Dhuleep Singh is still bragging contemptously.

Calcutta is supplied with 12 million gallons of filtered water a day.

Murderous assault on a party of four Englishmen is reported from Shiraz.

The installation ceremony of the Raja of Jhind has been fixed to take place on the 27th instant.

H. H. The Maharaja of Mysore and suite will pass some days in Bombay this week.

Dr. Tyler, C. I. E., Superintendent of the Agra Jail, has received the honor of knighthood.

During the last severe snowstorm, a native contractor and his two servants were frozen to death at Gandak.

The whole of the Shan States on the Burmah border may have to be annexed.

The French Governor of Tonquin has made a tour through India up to Peshawar.

The Bangalore Fort will be made over to the Mysore State on the 1st of April.

The Bombay Technical Institute will be permanently maintained by Government.

A Library Durbar will be held at Lahore in March; the Lieutenant Governor presiding.

The Prince of Wales invited the Gaekwar of Baroda to pay him a visit at Sandringham.

The salaries of all Civil Servants in Fiji are being reduced, including the Governor's.

In noticing this statement, Mr. Balfour says "It is a ridiculous lie. I do not believe Blunt ever made such an assertion."

## वऱ्हाड.

हवामानः--प्रातः काळीं थोडीशी थंडी असते. दोनपहरीं उन्हाळ्याचीं चिन्हें चांगलीं भासूं लागलीं आहे.

सुट्टी— आह्मी आपले प्रियवाचकास व आश्रयदात्यांस विनयपुर्वक कळवितों कीं पुढील सोमवारचा अंक, रविवार व सोमवार हे दिवस शिमग्याच्या सणाचे असल्यामुळें मामुल वहिवाटप्रमाणें, निघणार नाहीं. कारण कारखान्यांतील लोकांस सुट्टी द्यावी लागेल.

रा० रा० श्रीकृष्ण नरहर यांच्या नौकरीची मुदत आणखी एक वर्ष पर्यंत सरकारानें वाढविली असें कळतें.

रा० रा० अंबादास संतो देशपांडे यांस एकस्ट्रा आसिस्टंट कमिशनरच्या जागीं कायम केलें.

आम्हांस कळविण्यास वाईट वाटतें कीं पूर्ववऱ्हाडचे माजी एक्झिक्युटिव एंजिनियर मि. उडहौस यांस गेले शनवारी हैदराबादेस महामारीच्या उपद्रवानें देवाज्ञा झाली.

प्रो० छत्रे यांचा सर्कसचा खेळ येथें शिमग्याचे सुमारास येणार. यांचे खेळ फार चमत्कारीक व मनोरंजक आहेत. ते पहाण्याची संधी दवडूं नये.

मे० कमिशनर साहेब यांची स्वारी दवऱ्याहून उमरावतीस परत आली.

मि० विश्वनाथ मुदलीयार आ० ए० अक. हे इकडे येऊन येवतमाळास आपल्या कामीं रुजूं होण्यास गेले.

## वर्तमानसार.

शेतकरी लोकांस उपयोगी पडणाऱ्या पेढ्या तालुक्यानीहाय स्थापन करण्याची सूचना सर वेडर्बर्न साहेबांनीं केल्याप्रमाणें अद्याप ती रचना अमलांत कां येत नाहीं न कळे. लोकांनीं पुष्कळ बडबड केली तरी सरकारनें त्यांत मन घातल्याशिवाय शेतकरी लोकांचे हाल दूर होणार नाहींत.

नासिकास कै. वा. देवमामलेदार यांच्या नांवाची "यशवंत स्कुल" मांवानें नुकोच एक इंग्रजी शाळा स्थापन झाली. आम्ही ही शाळा चिरायु होवो असें इछितो.

अमेरिकेंतल्या स्त्रिया.—युनैटेड्स्टेट्स मध्यें ३० लक्ष स्त्रिया आपल्या उद्योगावर आपला निर्वाह करीत आहेत.

— अमेरिकेंत कांहीं कांहीं ठिकाणीं माणसास शिंगें आहेत ह्मणतात.

— रशिया व इंग्लंड यांत प्रेमाचा तह होईल असें दिसतें.

— चिकागो येथील कोर्टांत एक दिवसांत १०० नवराबायकोंच्या फारखती झाल्या.

— मार्च महिन्याच्या ७ व्या तारखेस मुंबई सरकार कायदे कौन्सिल भरविणार आहे.

Per annum in arrears 7



सिंधुनदीवर पूल बांधण्याचें काम सुरू आहे. या पुलास ७१० फूट लांबीची एकच कमान लावण्यांत येणार आहे या पुलाचें काम १८९० त पुरें होईल.

सरहद्दीचा सुरक्षितपणा रक्षण करण्याकरितां हिंदुस्थानसरकाराकडून कांहीं इंजिनियर तिकडे पाठविण्यांत येणार आहे.

युरोपखंडाच्या नवळ असलेल्या आपल्या समुद्रांत फ्रेंचसरकार आपलें आरमार जास्त वाढवीत आहे.

हिंदुस्थानांतील गाईम्हशींची मृत्युसंख्या दरसाल १ कोटीची आहे. १ कोटीपैकीं ३ कोटी गाईम्हशी मानव राक्षसांच्या भक्षस्थानीं दरसाल पडतात या संख्येंत गाईंची संख्या म्हशीपेक्षां जास्त आहे. मृत्युसंखेप्रक्षां दरसालची जननसंख्या फारच कमी आहे, असा शोध लागला आहे. आणि मानव राक्षसाच्या भक्षस्थानीं पडणाऱ्या गाईम्हशींची संख्या दिवसेंदिवस वाढ या कलावर येत चालली आहे. यावरून हे मानवराक्षस या भरतभूमींतील गाईम्हशींचा लवकरच अगदीं सप्पा उडवितील असें निःसंशय दिसत आहे. आर्य म्हणविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें गोमातेच्या रक्षणाचा आतां कांहीं तरी उपाय करावा. हा उपाय जर लवकरच करण्यांत आला नाहीं, तर सर्व आर्यांना धुळीचें दिवे खाण्याची वेळ येईल हें मात्र पक्कें समजावें.

बदरांची दुर्व्यसनीरी— लाहोर येथील एकीं पत्रांत लिहिलें आहे कीं, एका बखारींत पुष्कळ दिवस ९० ग्यालन दारूचें पीप पडलें असें पाहून त्यास बंदरांनीं भोक पाडलें आणि ते आंतील दारू पिऊं लागले. ही गोष्ट बखारीच्या मालकास न समजून बखारींतील रीतील कामगारांकडून दारू कमी होते असा त्यास संशय हा आला. हे उंदीर आपले दारू पिणें संपल्यानंतर तें भोक नसल्यातसें लिंपून ठेवीत असत; हें यांचें लिंपणें इतकें बेमालूम असे कीं, पुष्कळ लोक उदराचा संशय न घेतां या बखारींत असलेल्या निरअपराधी कामगार लोकांचा संशय घेऊं लागले. यावरून लुच्चे लोकांच्या करामतीवरून निरपराधी व प्रामाणिक लोक कसे फसले जातात हे सहन ठरतें.

मुंबई व्यापिका हल्लींचा भाव ७ टक्याचा आहे.

ग्लासगो प्रदर्शनाकरितां हिंदुस्थानसरकाराकडून कांहीं जिनस पाठविण्यांत आल्या आहेत.

पब्लिकसार्विसकमीशनचा रिपोर्ट छापण्याबद्दल अजून स्टेट सेक्रेटरीची मंजुरी मिळाली नाहीं.

मुंबईत मशीं जनावरांचे हाल न होण्याबद्दलची सभा आहे तशीच इंग्लंडांत लहान लहान पोरांचे हाल न व्हावे म्हणून एक सभा आहे.

हांगकांग बेटांत देवीचा उपद्रव बराच मातला आहे आणि तो उपाय नाहींसा व्हावा म्हणून तेथील लोकांना बऱ्याच फटाकड्यांच्या पेंड्या वाजविल्या ! !

चीनदेशांत एक बाराशे वर्षांपूर्वीचा एक सटीक ग्रंथ सांपडला आहे, आणि या ग्रंथाचा बरोबर तर्जुमा व्हावा म्हणून तो जपानच्या प्रधानानें आपणाकडे मागविला आहे.

ठा० म०

असें ऐकण्यांत येतें कीं, येत्या उन्हाळ्यांत हैदराबाद एथील प्रतिनिधी हे सिमल्यास व्हाइसरायाच्या भेटीकरतां जाणार आहेत. त्यांच्याबरोबर कर्नल मार्शल आणि सरकारचे कांहीं सेक्रेटरी हे असतील रायचूर एथील रेल्वे आणि हैदराबादचें सैन्य या गोष्टींचा बहुधा तेथें निकाल करून घेण्याकारितांच ही मुशाफरी होणार असेल !

हैदराबादचे प्रतिनिधी यांनीं सर्व जमाबंदीचें काम आपल्या हातांत घेऊन राज्यांत असा हुकुम काढला आहे कीं, जमाबंदी संबंधीं सर्व कागद पत्रे नवाबमुनिर उलमुल्क यांजकडे जात असत. ते यांजकडेस न पाठवितां प्रतिनिधीकडे एकदम पाठविण्यांत यावे. नबाब मुनिर उलमुल्क हे विनाखात्याचे मिनिस्तर कधींच नव्हत. फक्त ते आपल्या भावास या कामी मदत करीत. प्रतिनिधी साहेब आणि कर्नल मार्शल हे या खात्याविषयीं हल्लीं विचार करीत आहेत कीं, या खात्यांत खर्चाची छाटाछाटी कोठें कोठें करण्यासारखी आहे. फार उत्तम गोष्ट !

ते. मि.

गाईकवाड महाराज महाराणी व्हिक्टोरिया यांची परवानगी घेऊन देशीं येण्या करितां निघाले. या विषयीं मि० एलियट व समर्थ प्रायव्हेट सेक्रेटरी हजर होते. महाराणी साहेबांनीं गाइकवाड महाराज यांस उपदेश केला त्यांतील मतलब इतकाच होता कीं " सोंपलेला अधिकार मोठ्या काळजीनें राखा आणि दोस्तीच्या हकांत नातें कायम ठेवून इंग्लिश अधिकाराची इभ्रत जेणेंकरून वाढेल ती युक्ती योजा. आजवर तुमच्या कुळांतील लोकांशीं असलेला संबंध मित्रभावाचा होता परंतु आतां आपण चरंजीव मंडळींत आला आहात. तें नातें वृधिंगत कशानें होईल हे रात्रंदिवस ध्यानांत ठेवून राजसरणी भक्कम करा म्हणजे कोणत्याही बाजूनें धोका येणार नाहीं. तुमचे हातून या विरुद्ध वर्तन दृष्टीस पडणार नाहीं अशी खात्री समजून १९ तोफांची सलामी आज येथें देतें असें सांगून महाराज गाइकवाड यांस महाराणी सरकारांनीं विलायतेस तोफांची सलामी दिली. कोल्हापूरचे राजाराम महाराजांसुद्धां असा सन्मान मिळाला नाहीं तो गाइकवाडास मिळाला ही मोठ्या आनंदाची वार्ता आहे.

बडोद्यांत सुधारणेचें पाऊल पुढें पडत आहे. प्रपंच संबंधीं व्यवसाय कसा राखावा याजबद्दल उपदेश चालले आहेत. महाराज विलायतेहून आल्यावर असल्या सुधारणुकीची चंगळ उडणार. सभेत स्त्रियांस येण्याची पद्धत ख्यारीनें ठरण्याचा उपक्रम सुरू झाला. सभाज्यांत स्त्रिया असल्यानें मंडळीचें लक्ष घेतल्या कामाकडे विशेष लागतें अशी युरोपियन लोकांनीं समज येथील लोकांस पसंत पडूं लागली.

लार्ड सालिसबरी यांचे बंधु लार्ड पुरटेस सालिस हिंदुस्थानदेश पाहण्या करितां कलकत्यास आले आहेत.

— फ्रेंच गवरनर हिंदुस्थान देशांतील रीत रिवाज पाहण्याकारतां आले आहेत.

— शाहाचा धरा नवानें निघाला आहे. आतां तिकडची शाई लवकरच इकडे येईल.

तुर्क सरकारानें आफ्रिकेंतील सोमाळी किनाऱ्यावरील झिलहु गांव सोडून देण्यासाठीं सक्तीची ताकीद दिली आहे. ताकिदी प्रमाणें अमल झाल्यास हात घाईवर येणार.

कानपुराकडे विलायती गव्हाची पेरणी करून मातला पहाण्याचें काम चालूं होणार. हिंदुस्थानांतील बियाणें चांगलें असतां बलें विलायती बीं जमिनींत टाकून समाधान मानण्यांत अर्थ दिसत नाहीं. बहुत करून सर्व गोष्टी अशाच आहेत मग यासच का रडावें. आहे ते सर्व ठीक आहे.

पलटणवाज गृहस्थाची स्त्री एका महारावर फिदा होऊन आनंदरंगांत दंग होऊन गेली. पुढें त्याला घेऊन ती लखनोमध्यें एका हाटेलमध्यें जाऊन राहिली. मागाहून नवरा येऊन घरीं चालण्याविषयीं बहुत अर्जव करूं लागला परंतु तिनें सांगितलें कीं माझे प्रकृतीस येथें बरें वाटतें करितां कांहीं दिवस हीच हवा मला घेणें योग्य आहे. या उत्तरा बरोबर नवऱ्यास खालीं मान घालून झक मारीत परत जावें लागलें. स्वतंत्रता मिळविलेल्या बायका पासून पुरुषाची कशी फजीती होते ती पहा.

भोपाळ अमृतबजार पत्रिकेचा बातमीदार त्यास कळवितो कीं सर लिपल ग्रिफीन साहेब बेगम साहेबाच्या भेटीस ता० ९ रोजीं गेले. कांहीं मिनिटें तेथें ठरले तितक्या अवकाशांत प्रश्नोत्तरें झालीं तीं.

ग्रिफिन— आपली लाडकी बेटी निवर्तल्यामुळे आपल्यास येथें चैन पडत नसल्यास कलकत्यास यवता का?

बेगम—अद्याप तो विचार माझ्या मनांत आला नाहीं.

ग्रिफिन—आपली मुलगी गेल्यामुळें आपले डोकें फिरणे सहजी आहे.

बेगम—आमची डोकीं आपल्या सारखीं हालकी नाहींत.

ग्रिफिन—मुलीच्या विरहानें माता कष्टी झाली नाहीं याचें हें पहिलेंच उदाहरण माझ्या दृष्टीस पडत आहे.

बेगम—माझ्या ही जन्मांत आपल्या सारखा प्रेमळ पाहुणा दुःख निवारण करण्यासाठीं येऊन एका डोळ्यानें पाणी टाकतो व दुसऱ्या डोळ्यानें मायेस खुणावतो असा प्रथमच दृष्टीस पडला

ग्रिफिन—बेगमसाहेब! माझ्यापुढें आपण यवढ्या मोठ्या धाडस पणाचें कधीं ही बोलला नाहींत आणि आज ज्या अर्थी बोलतां त्या अर्थी आपली चित्तवृत्ति खास बिघडलीशी वाटते म्हणूनच दरबार डाक्टराचा अभिप्राय येण्यावर बोलणें बंद ठेवतो. इतकेंच बोलून साहेब जाहागिराबादेस निघून गेले.

या फेरींत सर लिपल साहेबांनीं कार्वाई व सासुबाई यांच्यामधील प्रेम समूळ काढून टाकलें व अहंमद अल्ली याजला भरवसा दिला कीं बेगम साहेबांस वेडा ठरवून आपले चर नीजाच्या नांवें गादी चालविण्याचा हुकूम देतो व आपल्यास त्याचें संरक्षक बनऊन सर्व मुलखाचें आपल्यावर सोपवितो.

पोलिटीकल कामांतील अधिकारी संस्थानदार व राजे रजवाडे याचे मातेरें करण्यास प्रवृत्त कसे होतात त्याचा हा नकाशा दाखविला आहे. यासाठीं सर्व जाहागिरदार लोकांनीं आप आपल्या जवळ एकएक उत्तम विद्वान मसलतदार नेमून ठेऊन त्यांजकडून अशा कठीण प्रसंगीं सर्व हकीगत वरिष्ट सरकारापुढें ठरण्याची घाई केल्यास कोल्हापूरच्या महाराजासारखे वेडे होण्याचा प्रसंग येणार नाहीं.

मा० मि०

हिंदुस्थानचे नवे येणारे व्हाइसराय ना० मार्किस आफ लान्सडौन यांच्या संबंधाची माहिती कळते ती येणें प्रमाणें:—यांचा जन्म १७४५ त झाले. लान्सडौनच्या चौथ्या मार्किसचे हे वडील चिरंजीव. आक्सफर्ड येथील कालेजांत यांचा विद्याभ्यास झाला व कांहीं दिवस हे एका स्वाड्रनीचे क्याप्टन होते. १८६६ सालीं यांना यांच्या वडिलांची इस्टेट व पदव्या मिळाल्या. १८६८ पासून १८७२ पर्यंत हे लार्ड आफ ट्रेझरांच्या हुद्यावर होते. पुढें १८७४ पर्यंत हे लढाई खात्याचे अंडर सेक्रेटरी होते. १८८० सालीं ना० ग्लाडस्टन साहेब यांच्या हातांत अधिकार होता या वेळीं यांस हिंदुस्थानचे अंडर सेक्रेटरी नेमले होते, परंतु पुढें २ महिन्यानींच प्रधान मंडळ बदलल्या मुळें आणी तें काम सोडलें. १८८३ च्या मे महिन्यांत महाराणी साहेबांनीं यांस कानड्याचे गव्हरनर जनरल नेमले. ती मुदत संपत आल्यामुळें हल्लीं यांची इकडे नेमणूक झाली आहे.

भूमातेचा खेळ:-- निमवी भीतल्या उमरेस हायजन म्हणून एक शहर होतें तें १००० वर्षांपूर्वी समुद्रांत बुडालें होतें. तें आतां वर येऊन दिसूं लागलें आहे. संगराजाचे कारकीर्दींतील ताटें आणि दुसरी भांडीं सांपडली आहेत.

क. त-

नोटीस.

रा. रा. सेक्रेटरी व भागीदार मंडळी नारायण लक्ष्मण आणि कंपनी आकोले यांस खालीं सहीकरणार याजकडून विनंती विशेष. सदरहु कंपनीत मी एक पंचमांश हिश्शाचा भागीदार आहे परंतु भागीदारात जो करारनामा लिहिला गेला त्याचें उलंघन आणि ज्या गोष्टीचा सेक्रेटरीस अधिकार दिला गेला नव्हता तो चालविणें व तशा कृतीस पक्ष धरून कांहीं भागीदारांनीं एकमेकाविरुद्ध वागणें खऱ्या गोष्टी व हिशेब पुढें न येणें या कामीं बक्षीर होणें तिकडे दुर्लक्ष करणें एकमेकांत भिन्न मतानीं वागणें या गोष्टीनें मी भागीदार राहु इच्छीत नाहीं सबब पुढील कर्तव्याबद्दल यापूर्वीं तीन पत्रानें कळविलें तरी मला त्याचें उत्तर ही नाहीं यासाठीं एकदम कायदेशीर मार्गास जाण्यापूर्वीं या प्रसिद्ध नोटीशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून तीन दिवसाचे आंत भागीदारी मोडल्यामुळें व मोडण्या करितां ज्या ज्या गोष्टी कराव्या लागतात त्या कराव्या तसें न केल्यास त्या होणेंसाठीं न्यायाचे कोर्टांत जाणें भाग पडेल व त्याबद्दल तुम्हास जातीनें खर्च सोसावा लागेल ही विनंती ता० १८-२-८८ ई॥

कृष्णाबाई म० पा० यादव रामचंद्र कोर्डे

☞ हें पत्र आकोला येथें के० मा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.